शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे

विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७

एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

मंगल कार्यालय

लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.

सौभाग्य मंगल कार्यालय

आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, मो.: ९०९६९६६२२२

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २१४ वा | मंगळवार, दि. ०१ एप्रिल २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# शेतकऱ्यांसाठी बॅंकांचे दरवाजे बंद; सरकारच्या भूमिकेनंतर नोटिसा अन अधिकारी शेतकऱ्यांच्या दारात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीत खुद्द देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीची ग्वाही दिली होती. पण, आता कर्जमाफीबद्दल राज्य सरकारने हात वर केल्याने राज्यातील २३ लाख थकबाकीदार शेतकऱ्यांसाठी बॅंकांचे दरवाजे कायमचे बंद झाले आहेत.



सद्य:स्थितीत राज्यातील सुमारे २३ लाख शेतकऱ्यांकडे बॅंकांची ३५ हजार कोटींची थकबाकी असल्याचे 'एसएलबीसी'तील सूत्रांनी सांगितले.

दरवर्षी कृषी पतपुरवठ्याचा आराखडा निश्चित होऊन राज्यस्तरीय बॅंकर्स कमिटीच्या माध्यमातून त्याची जिल्हानिहाय अंमलबजावणी होते. त्यानुसार रब्बी व खरीप हंगामात शेतकऱ्यांना बॅंका कर्जवाटप करतात. पण, ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ मध्ये राज्यात विधानसभेची निवडणूक झाली. त्यावेळी बहुतेक राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यात शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीचा मुद्दा होता. विद्यमान मुख्यमंत्र्यांनीही त्यांच्या प्रचारसभांमध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार असे स्पष्ट केल्याने शेतकऱ्यांना मोठी आशा लागली आणि अनेकांनी खरीप हंगामातील कर्जाची परतफेड केली नाही. त्यानंतर सत्तेत आलेले भाजप सरकार विशेषत: मुख्यमंत्री फडणवीस निश्चितपणे कर्जमाफी करतील, या आशेने रब्बी हंगामाचेही कर्ज शेतकऱ्यांनी थकविले. पण, अर्थसंकल्पात त्यासंदर्भात काहीही निर्णय झाला नाही आणि आता कर्जमाफी शक्य नसल्याचे सांगण्यात आल्याने थकबाकीदार शेतकरी चांगलेच अडचणीत सापडले आहेत. दुसरीकडे बॅंकांनी नोटीस बजावणी सुरू केली असून त्यांचे अधिकारीही दारात येत असल्याने शेतकऱ्यांची पंचाईत झाल्याची सद्य:स्थिती आहे.

# सोलापूर बाजार समितीसाठी माने, देशमुख, साठे, हसापुरे, शिवदारेंसह 479 उमेदवारी रिंगणात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी एकूण ४२९ उमेदवारांनी ४७९ अर्ज दाखल झाले आहेत. यात माजी आमदार तथा माजी सभापती दिलीप माने, त्यांचे चिरंजीव पृथ्वीराज माने, आमदार सुभाष देशमुख यांचे चिरंजीव मनीष देशमुख, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीराम साठे, राज्य सहकारी बॅंकेचे माजी संचालक अविनाश महागावकर, राजशेखर शिवदारे, सुरेश हसापुरे, इंद्रजित पवार यांच्यासह बहुतांश संचालक पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (Solapur Bazar Samiti) एकूण १८ संचालकांच्या जागांसाठी तब्बल ४२९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. यामध्ये सहकारी संस्था सर्वधारण - 151, सहकारी संस्था महिला राखीव - 31, सहकारी संस्था इतर मागासवर्ग -26, सहकारी संस्था विमुक्त जाती भटक्या जमाती - 37, ग्रामपंचायत सर्वसाधारण - 108, ग्रामपंचायत अनुसूचित जाती, जमाती - 33,



ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल घटक -20, व्यापारी प्रतिनिधी - 56, हमाल तोलार प्रतिनिधी - 17 असे एकूण 479 अर्ज दाखल झाले आहेत.

सोलापूर (Solapur) बाजार समितीच्या निवडणुकीत एकूण 835 अर्जांची विक्री झाली आहे. त्यातील 479 अर्ज दाखल झाले आहेत. तब्बल ५० उमेदवाराने दोन अर्ज भरले आहेत, उर्वरीत 429 जणांनी सिंगल उमेदवार अर्ज भरले आहेत, त्यामुळे बाजार समितीसाठी 479 अर्ज दाखल झाले आहेत.

बाजार समितीच्या निवडणुकीसाठी दाखलेल्या 479 अर्जांची छाननी एक एप्रिल रोजी होणार आहे. त्यानंतर दोन ते 16 एप्रिल दरम्यान उमेदवारांना अर्ज माघारी घेता येणार आहे. त्यानंतर 17 एप्रिलला पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध होणार आहे.

दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी माजी संचालक अविनाश मार्तंडे, इंदुमती अलगोंडा पाटील, बाळासाहेब शेळके, हरीश पाटील, राजेंद्र सुपाते, बाळासाहेब पाटील, केदार उंबरजे, माजी नगरसेवक किसन जाधव, शिवसेनेचे अमोल शिंदे, सिद्धाराम चाकोते, अमर पाटील, कळमणचे उपसरपंच सुनील पाटील, भीमाशंकर रमणशेट्टी, धनेश आचलारे, संतोष पवार, केदार विभूते अन्नप्पा सत्तूबर, इंद्रजीत लांडगे, सिद्धाराम हेले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

# खड्ड्यांच्या तक्रारीसाठी आता खड्डे तक्रार निवारण प्रणाली

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** पावसाळ्यानंतर रस्त्यांमध्ये खड्डे पडतात. असे खड्डे जलद दुरुस्त करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने खड्डे तक्रार निवारण प्रणाली विकसित केली आहे. त्यामुळे नागरिकांना आता खड्ड्यांबाबतची तक्रार ऑनलाईन करता येणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजाचे संगणकीकारण करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्यासोबतच खड्ड्यासाठी तक्रार प्रणाली विकसीत केली आहे.

नागरिक या प्रणालीच्या माध्यमातून तक्रार करू शकतात. प्रथम ढउफ़ अँप गुगल प्ले स्टोअर, केंद्र शासनाच्या m-Seva portal, किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाचे संकेतस्थळ www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावरून मोबाईलवर डाउनलोड करावे. नागरिकांनी त्यांच्या मोबाईल क्रमांकावर आलेल्या OTP चा वापर करावा आणि ॲप नोंदणी पूर्ण करावी. त्यानंतर तक्रार दाखल करण्यासाठी रजिस्टर फीडबॅक येथे क्लिक करावे. मोबाईल स्क्रीनवर नकाशा दिसेल. त्यामध्ये आपले लोकेशन निश्चित करून खड्ड्यांचा फोटो अपलोड करण्यासाठी 'Take Pothol Photo' या बटनावर क्लिक करावे. त्यानंतर खड्ड्यांचा फोटो घेऊन सदर तक्रारीबाबत अभिप्राय नोंदवावा आणि शेवटी तक्रार दाखल करावी.

या प्रणालीमध्ये तक्रारीची सद्यस्थिती दाखवण्याची व्यवस्था आहे. नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी तातडीने संबंधित शाखा अभियंता आणि उपअभियंता यांच्याकडे पाठवण्यात येतील. या माध्यमातून खड्डेमुक्त महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने सार्वजनिक बांधकाम विभागाने उचललेले महत्वाचे पाऊल आहे.

# ई-चलनाचा दंड भरला नसेल तर ड्रायव्हिंग लायसन्स होणार निलंबित



**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** जर तुम्ही तीन महिन्यांच्या आत तुमच्या वाहनाच्या ई-चलनाचा दंड भरला नसेल, तर तुमचे ड्रायव्हिंग लायसन्स निलंबित होऊ शकते. एवढेच नाही, तर एका आर्थिक वर्षात तीन वेळा वाहतूक नियम तोडणाऱ्या वाहनचालकांचे लायसन्स किमान तीन महिन्यांसाठी जप्त केले जाऊ शकते.

त्यामुळे वाहनचालकांनी वेळीच आपल्या ई-चलानाची देय रक्कम भरावी, अन्यथा मोठा दंड भरावा लागू शकतो.

**वाहतूक नियम तोडल्यास वाढू शकतो विमा प्रीमियम!**

सरकार आता बेपर्वा वाहनचालकांवर अधिक कठोर कारवाई करण्याच्या तयारीत आहे. ई-चलानाच्या फक्त 40% रक्कम वसूल झाली असून, मोठ्या प्रमाणावर वाहतूक नियमांचे उल्लंघन होत आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी गेल्या आर्थिक वर्षात किमान दोन चलान थकवलेल्या वाहनचालकांसाठी त्यांच्या वाहनाच्या विम्याचा प्रीमियम वाढवण्याचा विचार केला जात आहे. त्यामुळे वाहनचालकांसाठी ही एक गंभीर बाब ठरू शकते.

**वाहतूक नियमांसाठी नव्या तंत्रज्ञानाचा वापर**

सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच 23 राज्ये आणि 7 केंद्रशासित प्रदेशांना मोटार वाहन कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात अनुपालन अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. नवीन नियमानुसार, वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यासाठी स्पीड कॅमेरे, सीसीटीव्ही, स्पीड-गन, बॉडी-वॉर्न कॅमेरे आणि ऑटोमॅटिक नंबर प्लेट रेकग्निशन सिस्टीमचा (ANPR) मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना यापुढे कोणतीही सूट मिळणार नाही.

**दिल्लीसह अनेक राज्यांमध्ये वसुलीचा दर चिंताजनक!**

अहवालानुसार, दिल्लीमध्ये केवळ 14% दंड वसूल केला गेला आहे, तर कर्नाटकमध्ये 21%, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशमध्ये 27%, ओडिशामध्ये 29% दंड वसूल करण्यात आला आहे. याउलट राजस्थान, बिहार, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि हरियाणा यांसारख्या राज्यांमध्ये 62% ते 76% पर्यंत दंड वसुली झाली आहे.

**वाहनचालकांना दरमहा सूचना मिळणार!**

लोक वेळेत ई-चलान का भरत नाहीत, यामागे काही प्रमुख कारणे आहेत. काही वेळा चलान उशिरा मिळते किंवा चुकीचे चलान जारी होते. हे लक्षात घेऊन सरकार लवकरच एक नवीन मानक संचालन प्रक्रिया (SOP) लागू करणार आहे, ज्यामध्ये वाहन मालकांना त्यांच्या प्रलंबित दंडाची माहिती दरमहा पाठवली जाईल.

**आता नियम तोडल्यास जबरदस्त दंड!**

जर तुम्ही वेळेत ई-चलान भरले नाही, तर तुमच्या ड्रायव्हिंग लायसन्सवर थेट परिणाम होऊ शकतो. यामुळे भविष्यात वाहन चालवताना अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. सरकार आता कोणत्याही प्रकारच्या नियमभंगास सहन करणार नाही, त्यामुळे वेळीच दंड भरा आणि वाहतुकीचे नियम पाळा!

# जिल्हा परिषद बांधकाम विभागाचा उपअभियंता लाच घेताना सापडला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** करमाळा तालुक्यातील पूर्ण केलेल्या रस्त्यांच्या कामांची देयके अदा करण्याच्या अनुषंगाने प्रक्रिया पार पाडण्यासाठी एका कंत्राटदाराच्या पर्यवेक्षकाकडून ३० हजार रुपयांची लाच मागितली आणि तडजोडीत २० हजारांची लाच घेताना जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या करमाळ्यातील उपअभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचून पकडले.

बबन हिरालाल गायकवाड असे या कारवाईत सापडलेल्या उपअभियंत्याचे नाव आहे.



जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक १ मार्फत करमाळा तालुक्यातील वांगी, वीट, चोपडे वस्ती, वरकुटे, साडे, झरे आदी गावांच्या शिवारात रस्त्यांची सुधारणा करण्याची कामे करण्यात आली आहेत. या कामांची निविदा यातील तक्रारदार हे पर्यवेक्षक म्हणून सेवेत असलेल्या एका कंत्राटदाराला मंजूर झाली होती. त्यानुसार पूर्ण केलेल्या कामांचे प्राथमिक देयक पाच लाख ८७ हजार ८६१ रुपयांचे मंजूर होऊन रक्कम प्राप्त झाली होती. उर्वरित दोन कामांचे देयक प्रलंबित आहे. त्याची पूर्तता करण्यासाठी उपअभियंता बबन गायकवाड यांनी ३० हजारांची लाच मागितली. तडजोडीत २० हजार रुपये देण्याचे ठरविले.

तथापि, याप्रकरणी संबंधित कंत्राटदाराच्या पर्यवेक्षकाने सोलापूरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयात तक्रार नोंदवली. त्याची पडताळणी केल्यानंतर करमाळा येथे जिल्हा परिषद बांधकाम विभाग कार्यालय परिसरात सापळा रचण्यात आला. यात गायकवाड हा लाच घेताना रंगेहाथ पकडला गेला. पोलिस उपअधीक्षक गणेश कुंभार यांच्या पर्यवेक्षणाखाली पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले यांच्या पथकाने ही कारवाई पूर्ण केली. याबाबत करमाळा पोलीस ठाण्यात उपअभियंता बबन गायकवाड याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

# राज्यातल्या धरणांत पाणीसाठा झपाट्याने खालावत चालला. फक्त 47.74 टक्के जलसाठा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उन्हाच्या झळा जसजशा वाढत चालल्या आहेत त्याचबरोबर राज्यातल्या धरणांतील पाणीसाठा झपाट्याने खालावत चालला आहे. दोन आठवड्यांपूर्वी 50 टक्क्यांवर असलेला पाणीसाठा आता 47 टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे लवकरच पाणी पुरवण्याचे नियोजन करावे लागणार आहे अशी चिन्हे आहेत. राज्यात 2 हजार 997 धरणे आहेत. उन्हाळ्याच्या झळा वाढण्यास सुरुवात होताच जलसिंचन विभागाने दररोज पाण्याच्या साठ्याचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे त्यानुसार शनिवारी राज्यातल्या



धरणातील पाणीसाठा 47.47 टक्क्यांवर आल्याची नोंद झाली आहे. मागील वर्षी याच दिवशी धरणांतील पाणीसाठा 40.16 टक्के होता.

पैठण (जायकवाडी) - 54.95टक्के, कोयना - 53.51 टक्के, धोम -44.67 टक्के, उजनी (सोलापूर) - 28.26 टक्के, बारवी - 49.62 टक्के, तिलारी - 38.27 टक्के, नीरा देवधर - 18.77 टक्के, पवना - 40.49 टक्के, पानशेत - 46.73 टक्के, मुळशी टाटा - 47.67 टक्के.

## आजपासून महागणार खरेदी-विक्रीचे व्यवहार!

# सोलापूरचा रेडीरेकनर दर सर्वाधिक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे नोंदणी महानिरीक्षक व नोंदणी नियंत्रकांच्या आदेशानुसार २०२२-२३ नंतर राज्यातील खरेदी-विक्रीचे व्यवहार एक एप्रिलपासून महागणार आहेत. महापालिका क्षेत्रात (मुंबई वगळता) रेडीरेकनर दरात सरासरी ५.९५ टक्क्यांनी वाढ झाली आहे, तर ग्रामीण भागात ३.३६ टक्क्यांनी रेडीरेकनर दर वाढणार आहे.

या नव्या दराची अंमलबजावणी उद्यापासून (१ एप्रिल) होणार आहे. राज्यातील २८ महापालिकांच्या तुलनेत सोलापूर महापालिका क्षेत्रातील रेडीरेकनर दर सर्वाधिक वाढला आहे. त्यामुळे खरेदी-विक्री महागणार आहेत.

राज्यात २०२२-२३ नंतर रेडीरेकनर दरात वाढ झालेली नव्हती. तीन वर्षानंतर २०२५-२६ या आर्थिक वषार्साठी मुद्रांक शुल्क विभागाने खरेदी-विक्रीच्या व्यवहाराचे दर वाढविले आहेत. त्यात राज्याची सरासरी वाढ ४.३९ टक्के असणार आहे. सदनिकांचे दर महापालिका



क्षेत्रांकरीता जमीन व बांधकाम दरापेक्षा कमी असल्यास ते जमीन व बांधकाम दराएवढेच ठेवले आहेत. याशिवाय प्रभाव व ग्रामीण क्षेत्रात सदनिकांचे दर किमान बांधकाम दराइतके येत नसल्यास ते किमान बांधकाम दराइतके ठेवले आहेत. पूर्वी खरेदी-विक्रीच्या व्यवहारासाठी सध्या १०० रुपये खर्च येत असेल तर आता वाढीव दरानुसार एक एप्रिलपासून चार रुपये अधिक मोजावे लागणार आहेत.

**'मुद्रांक'मधून मिळाले ५७ हजार ४४२ कोटी**

मुद्रांक शुल्क विभागाला २०२४-२५ या आर्थिक वर्षात सुरवातीला ५० हजार कोटींच्या उत्पन्नाचे उद्दिष्ट होते, पण त्यात पाच हजार कोटींची वाढ करण्यात आली होती. तरीदेखील, राज्यातील खरेदी-विक्रीच्या २९ लाख व्यवहारांमधून तब्बल ५७ हजार ४४२ कोटी रुपयांचा मुद्रांक शुल्क मिळाला आहे. आजवरील ही उच्चांकी मुद्रांक शुल्कापोटी जमा झालेली रक्कम आहे.

(पान 2 वर..)

**सोलापूर महापालिका क्षेत्रात सर्वाधिक वाढ**

सोलापूर जिल्ह्यात अनगर, वैराग, नातेपुते, श्रीपूर-महाळुंग नगरपंचायती, अकलूज नगरपरिषद काही वर्षांपूर्वी अस्तित्वात आल्या आहेत. याशिवाय सोलापूर महापालिकेची हद्द देखील वाढली आहे. हद्दवाढ व नव्या नगरपरिषदा, नगरपंचायतीच्या क्षेत्रातील व्यवहार सध्या जास्त दराने होत आहेत. तर ग्रामीणमधील दर देखील वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर जास्त दराने तथा मोबदला देऊन होणारे व्यवहार आणि काहीशी घट, याच्या सरासरीनुसार सोलापूरचा विशेषतः महापालिकेच्या क्षेत्रातील रेडीरेकनर दर १० टक्क्यांपर्यंत पोचल्याचे निरीक्षण मुद्रांक शुल्क अधिकाऱ्यांनी नोंदविले.

दैनिक सोलापूर www.katusatya.in कटूसत्य katusatya@gmail.com मुख्य कार्यालय संपादक पांडूरंग हरिदास सुरवसे उपसंपादक सचिन मोहन जाधव सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

पत्ता :- वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर, फोन : ०२१७-२६०५०९१, ०२१७३५५०५९२, मो. ९६५७०६९०६९, मो.९७६५३९०३३९

आपणही होवू शकता "मुक्त पत्रकार"

नमस्कार....,

आपणही "मुक्त पत्रकार" होवून समाजात मानसन्मान व प्रामाणिकपणे काम करुन प्रामणिक पैसे कमवू शकता. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक "मुक्त पत्रकार" होवू शकतो.

या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण १०००/- रूपये भरून वार्षिक वर्गणीदार (सभासद) होणे आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी भरणाऱ्यास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपली किंवा आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) इतकी जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक "कटूसत्य" या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून, दैनिक सोलापूर कटूसत्य या नावानी चेक/डी.डी.किंवा Daily Solapur Katusatya, Lokmangal Co-Op Bank LTD., Solapur, AC:- 0020011120001265, IFSC:- IBKL0478LOK या खात्यावर आपली रक्कम ऑनलाईनद्वारे जमा करून वर्गणीदार व्हा. आणि "मुक्त पत्रकार" होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. आणि रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, भारतीय असल्याचा पुरावा आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठवा. म्हणजे या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:-** १) आपण आपली संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल मध्ये "मुक्त पत्रकार" म्हणून ओळखपत्र पाठविले जाईल. २) "मुक्त पत्रकार" मुळ ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल व इतर खर्च २००/- रूपये आपणास द्यावे लागतील. (कार्यालयात येवून हे सर्व साहित्य घेऊन गेल्यास पोस्टल खर्च घेतला जाणार नाही.) ३) सहा महिन्या नंतर "मुक्त पत्रकार" म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ४) आपण सर्व प्रकारच्या बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार दैनिक 'कटूसत्य' व 'वृत्तदर्पण' न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले जातील. ५) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही गावातील, शहरातील किंवा महानगरातील व्यक्ती "मुक्त पत्रकार" म्हणून काम करू शकतो. ६) आपल्या वृत्तपत्र व न्यूज चॅनलच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या (जमा केलेल्या) रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ७) या योजनेत सहभागी होवून कमिशनच्या स्वरूपात पैसे कमावण्याची संधी आहे. ८) आमचे "मुक्त पत्रकार" झाल्यानंतरच आपल्या जाहीराती स्वीकारल्या जातील व आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ९) कोणत्याही जाहिरातची संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जाणार नाही. १०) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ११) मग...! चला तर, आजच "मुक्त पत्रकार" होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

आपला विश्वासू
सपादक दे.सा.कटूसत्य

टिप:- "कटूसत्य" व "वृत्तदर्पण" या समुहात आपले स्वागत. आपण आणखीन काहीजणांना आपल्या समुहात सामील कराल अशी अपेक्षा.

## संपादकीय

# 'शिवशाही'ची दारुणावस्था

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सुरू केलेली शिवशाही बससेवा ही प्रवाशांसाठी अत्यंत आरामदायी, सुरक्षित आणि विश्वासार्ह सेवा असेल, असे प्रवाशांना वाटले होते. ही लक्झरी बससेवा खासकरून लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी सुरू करण्यात आली आणि ती राज्यातील महत्त्वाच्या शहरांना जोडते. खासगी लक्झरी बसेसप्रमाणे पुशबॅक सीट्स आणि लांब लेग स्पेसमुळे दूरच्या प्रवासातही आरामशीर बसण्याची सोय यामध्ये आहे. प्रत्येक सीटजवळ चार्जिंग पोर्टची सोय, प्रवासाच्या सुरक्षिततेसाठी बसमध्ये जीपीएस ट्रॅकिंग सुविधा, सीसीटीव्ही कॅमेरे, प्रवासादरम्यान वाचनासाठी लाइटची सोय आणि मुख्य म्हणजे खासगी लक्झरी बसेसच्या तुलनेत स्वस्त दरात प्रवास यामुळे राज्यातील गरीब, निम्नमध्यमवर्गीय, मध्यमवर्गीय प्रवाशांमध्ये ही बससेवा भलतीच चचेर्ची ठरली. प्रमुख शहरांमध्ये शिवशाहीतून प्रवास करण्यासाठी लोकांच्या रांगा दिसतात; पण एकदा प्रवास करून आलेला प्रवासी पुन्हा शिवशाहीतून जाण्यास नकार देतो. 2016 मध्ये तत्कालीन परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी मोठा गाजावाजा करून शिवशाही बससेवा सुरू केली होती. पण पहिल्या दिवसांपासून ही लक्झरी बससेवा वादात सापडली. सुरुवातीच्या अवघ्या 3 वर्षांमध्ये म्हणजे 2016 ते 2019 या काळात शिवशाही बसेसचे तब्बल 550 अपघात झाले होते आणि त्यात 50 प्रवाशांचा मृत्यू झाला होता. गेल्या सहा वर्षांमध्ये अनेकदा शिवशाहीच्या अपघातांबाबत ओरड व चिंता व्यक्त होऊनही या बससेवेच्या कारभारात कसलाही फरक पडलेला नाहीये. मुळात भाडेतत्त्वावरील शिवशाहींचा महामंडळात समावेश करताना खासगी चालकांना महामंडळाकडून प्रशिक्षण देण्याची अट घालण्यात आली होती. मात्र खासगी कंपन्यांकडून या अटींची पूर्तता करण्यात आली नाही. त्यामुळे अतिवेगाने गाडी चालवून नियंत्रण सुटणे, पुरेशी झोप नसणे, घाटमाथ्यावर बसच्या लांबीचा अंदाज न येणे या आणि अन्य कारणांमुळे अपघात होतात.

नोव्हेंबर 2024 मध्ये गोंदिया जिल्ह्यातील खाजरी गावाजवळ शिवशाही बस पलटी होऊन 15 प्रवाशांचा मृत्यू झाला, तर 25 जण जखमी झाले. बस चालकाने मोटारसायकल स्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात नियंत्रण गमावले, ज्यामुळे हा अपघात झाला होता. चालू वर्षाच्या सुरुवातीला पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर तळेगाव टोल नाक्याजवळ शिवशाही बसला आग लागली. सुदैवाने, सर्व प्रवासी सुरक्षितपणे बाहेर पडले आणि कोणतीही जीवितहानी झाली नाही. मार्च महिन्यात पुणे-सातारा मार्गावर शिवशाही बसला आग लागली.

या घटनेत 30 प्रवासी सुरक्षितपणे बाहेर पडले आणि कोणतीही जीवितहानी झाली नाही. दोन वर्षांपूर्वी पुण्यातील संगमवाडी पुलावर ब्रेक फेल झाल्यामुळे शिवशाही बस झाडावर धडकली. बसमध्ये 25 प्रवासी होते, परंतु कोणतीही जीवितहानी झाली नाही. फेब्रुवारी महिन्यात अमरावतीवरून नागपूरला जाणाऱ्या भरधाव शिवशाही एसटी बसचं पुढचं टायर आपोआप निघलं. भरधाव बसचं टायर निखळल्यानंतर ते लांब अंतरावर गेलं. मात्र सुदैवाने 50 पेक्षा अधिक प्रवाशांचा थोडक्यात जीव वाचला. अमरावती नागपूर महामार्गावर ही धक्कादायक घटना घडली. काही दिवसांपूर्वी परतवाडा आगाराच्या बसचाही अशाच प्रकारे टायर निघल्याचा प्रकार पाहायला मिळाला होता.

गेल्या वर्षी नागपूरवरून अकोल्याला जाणारी बस पलटी झाल्याने 25 पेक्षा अधिक प्रवाशी जखमी झाल्याची घटना घडली होती. गायीला वाचविण्याच्या प्रयत्नात हा अपघात झाल्याचे त्यावेळी सांगितले गेले. केवळ अपघातच नव्हे तर एकंदरीतच या बसची कासवगती, त्यातील एसीविषयीच्या तक्रारी आणि चालकांचा बेदरकारपणा अशा अनेक कारणांमुळे अनेकांनी सोशल मीडियावर या बससेवेला 'शवशाही' असे म्हटले आहे. राज्यात एसटी महांडळाच्या ताफ्यात साध्या, निमआराम, स्लिपर कोच, शिवशाही, इलेक्ट्रिकसह सर्वप्रकारच्या सुमारे 15 हजार 600 च्या जवळपास बसेस आहेत. त्यात 892 शिवशाही बसेसचा समावेश आहे.

या बसमधील सीट कव्हर आणि पडदे अस्वच्छ असल्याचे दिसून येत आहेत. 'शिवशाही' वातानुकूलित असल्याने ती बंदिस्त असते. भरप्रवासात 'एसी' बंद पडल्यास प्रवासी घामाघूम होतात; तसेच काहींना गुदमरल्यासारखे होते. त्यामुळे प्रवाशांना उलट्या होण्याचे प्रकार वाढले आहेत. 'एसटी'कडे वारंवार तक्रारी करूनही परिस्थिती 'जैसे थे' असल्याने तक्रार करायची कुठे, असा संतप्त सवाल प्रवासी विचारत आहेत. बरेचदा ही वातानुकूलित बस नादुरुस्त झाल्यानंतर ऐनवेळी हिरकणी (सेमी लक्झरी) प्रकारातील एसटी स्थानकातून चालवण्याचे आदेश विभागप्रमुखांकडून देण्यात येतात. या बदलाची पूर्वकल्पना प्रवाशांना देण्यात येत नाही. यामुळे वातानुकूलित बसचे आगाऊ आरक्षण करूनही प्रवाशांना उष्णतेचे चटके सोसत प्रवास करावा लागतो. अनेक वेळा या गाड्या विलंबाने देखील मार्गस्थ करण्यात येतात. याखेरीज शिवशाही बसमध्ये प्रचंड अस्वच्छता असल्याची टीका प्रवाशांकडून केली जाते.

मराठी विश्वातील कलाकारांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहून शिवशाही बसप्रवासाचे भयावह वाटावेत असे अनुभव मांडले आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) सर्वाधिक अपघातांचे प्रमाण हे शिवशाही बसेसचे आहे. या बसेस वाईट अवस्थेत असतानाही महामंडळाकडून वातानुकुलितच्या नावाने सर्वाधिक प्रवासी भाडे आकारले जाते, याबाबत नागरिकांत रोष आहे. एसटी महामंडळाच्या बसेसच्या अपघातांचे प्रमाण 0.17 टक्के आहे. म्हणजे, सहा लाख किलोमीटरमागे एक अपघाताची नोंद आहे.

यात शिवशाही बसच्या अपघातांचे प्रमाण 0.29 टक्के आहे. म्हणजे प्रत्येक 3 लाख 50 हजार किलोमीटरमागे 1 अपघात नोंदवला जात आहे. त्यामुळे शिवशाही बसने प्रवास करणाऱ्यांचा जीव धोक्यात असल्याचा आरोप एसटीतील कामगार संघटनेकडून केला जात आहे. तांत्रिक विभागात अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे सेवेवरील कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत असून बसेसच्या गुणवत्तेवरही परिणाम होत आहे. त्यामुळेच शिवशाही बसेसचे अपघात वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर सरकारने एक तर शिवशाही बससेवेच्या सर्व पातळ्यांवरील सुधारणांकडे लक्ष द्यावे किंवा ही बससेवा बंद करावी, असा सूर उमटत आहे.

पान १ वरून

## आजपासून महागणार खरेदी...

**महापालिकानिहाय रेडीरेकनर दर असा...**

सोलापूर (१०.१७ टक्के), ठाणे (७.७२ टक्के), मिरा-भाईंदर (६.२६ टक्के), कल्याण-डोंबिवली (५.८४ टक्के), नवी मुंबई (६.७५ टक्के), उल्हासनगर (९ टक्के), भिवंडी-निजामपूर (२.५० टक्के), वसई-विरार (४.५० टक्के), पनवेल (४.९७ टक्के), पुणे (४.१६ टक्के), पिंपरी-चिंचवड (६.६९ टक्के), सांगली-मिरज-कुपवाड (५.७० टक्के), कोल्हापूर (५.०१ टक्के), इचलकरंजी (४.४६ टक्के), नाशिक (७.३१ टक्के), मालेगाव (४.८८ टक्के), धुळे (५.०७ टक्के), जवळगाव (५.८१ टक्के), अहिल्यानगर (५.४१ टक्के), छत्रपती संभाजीनगर (३.५३ टक्के), नांदेड-वाघाळा (३.१८ टक्के), लातूर व जालना (४.०१ टक्के), परभणी (३.७१ टक्के), अमरावती (८.०३ टक्के), अकोला (७.३९ टक्के), नागपूर-एनएमआरडीए (४.२३ व ६.६० टक्के), चंद्रपूर-एमएचएडीए (२.२० व ७.३० टक्के).

# शक्तीशाली भूकंपाने म्यानमार-थायलंड हादरवले; अशाप्रकारे नैसर्गिक महाप्रलय जगात कुठेही येवू शकतात; सावधान!



दिनांक २८ मार्च २०२५ ला म्यानमार-थायलंडचा ७.७ तीव्रतेचा भयावह भूकंप तेथील जनतेसाठी अंधक्कारात नेणारा ठरला व यामध्ये शेकडोच्या संख्येने जिवितहानी झाली असून लाखोंच्या संख्येने गंभीर जखमी झालेत व अनेकजन अजुनही ढीगाऱ्यामध्ये दबलेले आहेत. हे दृश्य पाहून अंगावर शहारे येतात.म्यांमार-थायलंड किंवा अन्य ठिकाणी भयावह भूकंप किंवा महाप्रलय का येतात !याचे जिवंत उदाहरण म्हणजे मानवाने निसर्गावर केलेला अन्याय व अत्याचार होय.आज मानवाने स्वतःच्या स्वाथार्साठी आकाश-पाताळ -पृथ्वी, चंद्र-सुर्य, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण, ग्रह-तारे या सर्वांवर अतीक्रमन करून स्वतःसाठी सुखसुविधा निर्माण केल्या.परंतु या सुखसुविधा विनाशाकडे नेणाऱ्या आहेत आणि त्याचेच प्रायश्चित्त आज म्यानमार-थायलंड सारख्या जगातील अनेक देशांना भोगावे लागत आहेत व पुढेही मोठ्या प्रमाणात भोगावे लागण्याचे चिन्ह दिसत आहे. आज मानवाने केलेल्या प्रगतीचा दुरूपयोग होत असल्याने भूकंप, सुनामी, महाप्रलय,वनवे लागने,अती उष्णता,अती पाऊस,अती थंडी, ग्लेशियर वितळणे,ज्वालामुखीचा उद्रेक, समुद्राची पातळी वाढने, भुजलसाठा दिवसेंदिवस कमी होणे या संपूर्ण विनाशकारी उद्धवणाऱ्या घटना मानवाने स्वतःहून ओढवल्या आहे.कारण वाढते शहरीकरण,औद्योगिकीकरण व सुखसुविधा याकरीता मोठ्या प्रमाणात जगात जंगलतोड सुरूच आहे. यामुळे पृथ्वीच्या पोटात ज्या प्रमाणात पाणी साठा किंवा भुजलसाठा पाहिजे होता तो साठा अजीबात नसुन; जो आहे तोही दिवसेंदिवस कमी-कमी होत आहे.यामुळे जगात मोठ्या प्रमाणात वनव्याच्या घटना, भूकंप,ज्वालामुखीचा उद्रेक वाढतांना दिसतात.त्याचप्रमाणे ज्वालामुखीचा उद्रेक यांचेही मुख्य कारण जंगलतोड व बदलत्या हवामानामुळे होत आहे हे भयावह दृश्य आज आहे आणि पुढे चालून उग्र रूप धारण करून महाभयानक होण्याचे संकेत दिसत आहे. जग निर्मात्या संपूर्ण धर्मांच्या देवी-देवतांनी मानवाला जन्माला यासाठी घातले की या पृथ्वीतलावर एकतरी बुध्दीजीवी प्राणी असावा जेणेकरून तो संपूर्ण मानवजातीसह, मुक्या प्राण्यांची, संपूर्ण जीवजंतू, पशुपक्षी, निसर्ग व पृथ्वी यांचे रक्षण करू शकला पाहिजे.परंतु आज मानवाने स्वतःच्या फायद्यासाठी व स्वाथार्साठी संपूर्ण सीमारेषा ओलांडून आज पृथ्वीवरील संपूर्ण प्राणीमात्रांचा जीव धोक्यात टाकला आहे व याचे जिवंत उदाहरण म्हणजे म्यानमार-थायलंडमध्ये ७.७ तीव्रतेचा आलेल्या भूकंपाने संपूर्ण अस्तव्यस्त करून हाहाकार निर्माण केला.आज जगातील अनेक देश आगीशी खेळतांना दिसतात यात अमेरिका, रशिया, युक्रेन, इजरायल, इराण, पोलंड,चीन, उत्तर कोरिया इत्यादीसह अनेक देश एकमेकांवर बंदुका तानुन बसले आहेत व मोठ्या प्रमाणात बॉम्ब वर्षाव करीत आहे यामुळे सर्वत्र आगडोंब उसळल्याचे दिसून येते आणि हे सर्व वर्चस्वाच्या लढाईसाठी आहे.याकरीता एकमेकांना मोठ्या प्रमाणात विनाशकारी युद्ध सामुग्रीची देवाणघेवाण सुध्दा करीत आहेत.यामुळे अनेक देश युध्दाच्या खाईत लोटल्याने तीथे फक्त आगीचे गोळे बरसतांना दिसतात. आज जगातील करोडो एकर भुभागांची राखरांगोळी झालेली आहे व अनेक मोठमोठी जंगले आताही जळत आहे. जगातील संपूर्ण देश आज बारूतच्या ढीगाऱ्यावर बसले आहे. एवढे नुकसान डोळ्यासमोर असुनही रशिया -युक्रेन, इजरायल-इरान,हमास सह अनेक देश एकमेकांना संपविण्याची भाषा करीत आहे व युद्ध सामुग्रीच्या शर्यतीत चढा-ओढ सुरू आहे.म्हणजेच आज जग किती विनाशाकडे जात आहे हे चित्र स्पष्ट दिसून येते. जगातील काही देश गृहयुद्धाने भरडलेले आहेत त्यामुळे तीथेही रक्ताच्या नद्या वाहतांना दिसतात.पृथ्वीचा व निसगार्चा विनाश वेळीच रोखला गेला नाही तर धरणीमाता पृथ्वीतलावर असणाऱ्या संपूर्ण जीवसृष्टीला गीळंकृत केल्याशिवाय राहणार नाही हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे जगातील नेत्यांनो आतातरी सावधान व्हा व पृथ्वीला वाचवण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करा अजुनही वेळ गेलेली नाही.कारण मानवाने आपल्या सुखसुविधांसाठी संपूर्ण हद्दी पार केल्याचे दिसून येते.या पृथ्वीतलावर लाखो प्रजातीचे प्राणी, पशुपक्षी, जीवजंतू वास्तव करतात. परंतु यात बुध्दीजीवी जात एकच आहे ती म्हणजे मानव आणि एकट्या मानवाने ही विनाशलिला उभी केली आहेत.त्यामुळे जगात दिवसेंदिवस भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे आणि याला मुख्य कारणीभूत फक्त बुध्दीजीव प्राणी म्हणजे मानवच आहे. जगात दिवसेंदिवस विनशलिला वाढतच आहे तरीही मानलाचा निसर्गावर व पृथ्वीवर होणारा अत्याचार अजुनपर्यंत थांबलेला नाही हे मानवजातीचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.मानवाने आपला अतिरेक वेळीच थांबविला नाही तर म्यांमार-थायलंड पेक्षाही भयावह भुकंप किंवा महाप्रलय जगाच्या कानाकोपऱ्यात केव्हाही कधीही उद्भवू शकतात यालाही नाकारता येत नाही. असे सांगितले जाते की म्यांमार -थायलंडमध्ये आलेला भूकंप हा २०० वर्षांपूर्वी आलेल्या भूकंपापेक्षाही घातक असल्याचे सांगितले जाते.भारतात गुजरात मधील भुजमध्ये २६ जानेवारी २००१ ला ७.७ तीव्रतेचा भूकंप आलेला होता.तेव्हा या भूकंपात २० हजार लोकांचा मृत्यू झाला होता व दिड लाखांपेक्षा जास्त लोक गंभीररीत्या जखमी झाले होते आणि मोठ्या प्रमाणात वित्तीय हानी सुध्दा झाली होती. वैज्ञानिकांकडुन सांगितले जाते की भूकंपचा केंद्र असलेला म्यानमार मधील मांडाले क्षेत्र संवेदनशीलमध्ये गणल्या जाते. भारतीय आणि यूरेशियन प्लेट यांच्यात टकराव झाल्याने २८ मार्चला भिषण भूकंप आला.या सर्वच घटनांना कारणीभूत आपणच आहोत.आज युद्धजन्य परिस्थिती व बदलते हवामान यामुळे अनेक पशुपक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे संपूर्ण परिस्थिती पाहता जगातील संपूर्ण देशांनी येणाऱ्या नैसर्गिक आपदांपासुन सावध रहाण्यासाठी निसगार्ची जोपासना केली आहे.कारण म्यानमार -थायलंड आलेल्या अती तीव्रतावाल्या भुकंपाने भारतातील अरूणाचल प्रदेश,पश्चिम बंगाल येथे झटके जानवले सोबतच चीन, व्हियेतनाम,तायवान, आणि लाओस याठिकाणी सुध्दा भूकंपाचे झटके जानवले.म्हणजे नैसर्गिक आपदा केव्हा व कुठे येईल हे सांगता येत नाही.आग व पाणी यांच्याशी खेळू नका कारण आग केव्हा भस्मसात करेल ते सांगता येत नाही व पाणी केव्हा कुठे वाहुन नेईल व डुबवेल हेही सांगता येत नाही त्यामुळे सावधान !कारण या जखमा कधीच भरून निघु शकत नाही.त्यामुळे जगातील देशांनो पृथ्वीच्या रक्षणासाठी सवोतीपरी प्रयत्न करा तेव्हाच आपण येणाऱ्या नैसर्गिक महाप्रलयाला थोडा का होईना अंकुश लावु शकु.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# एप्रिल फूल

आज १ एप्रिल आजचा दिवस संपूर्ण दिवस जगात एप्रिल फूल म्हणून साजरा केला जातो. फूल (fool) म्हणजे मूर्ख. या दिवशी लोक एकमेकांना मूर्ख बनवतात. आपणही या दिवशी कोणाला तरी मूर्ख बनवलेच असेल. दुसऱ्याला मूर्ख बनवून एप्रिल फूल करण्याचा आनंद आपण सगळ्यांनीच लुटला असेल. एप्रिल फूल या प्रथेची सुरवात कधी झाली हे निश्चितपणे सांगता येणार नाही. याबाबत अनेक कथा प्रचलित आहे त्यातल्या एका फ्रेंच कथेनुसार पंधराव्या शतकात फ्रान्समध्ये ज्युलियन कॅलेंडर वापरत होते त्या कॅलेंडरप्रमाणे नववषार्ची सुरवात २५ मार्च ते १ एप्रिल या आठवड्यात होत असे. या आठवड्यात सगळे लोक वसंत ऋतूचे स्वागत आणि १ एप्रिलला नववर्ष साजरे करीत असत. मात्र १५८२ सालापासून फ्रेंच लोकांनी ग्रेगरियन कॅलेंडर स्वीकारले. या कॅलेंडर नुसार १ जानेवारीपासून पासून नववर्षाचा प्रारंभ होतो. हा बदल तेथील ग्रामीण भागातील अशिक्षित लोकांना माहीत नव्हता ते १ एप्रिलाच नववर्ष साजरा करीत त्यामुळे या लोकांना तेथील उच्चभ्रू, सुशिक्षित लोक मूर्ख (fool) म्हणत. जे लोक १ एप्रिलला नववर्ष साजरा करीत त्यांना फ्रांसमध्ये एप्रिल फूल असे संबोधले जाई. अशा तऱ्हेने १ एप्रिलला एप्रिल फूल करण्याची प्रथा जगभर पसरली. फ्रेंच लोक भारतात आल्यानंतर भारतातही ही प्रथा सुरू झाली. १ एप्रिलला आपले मित्र, नातेवाईक यांना एप्रिल फूल करण्याची प्रथा आता चांगलीच रुजली आहे. काळानुसार बदल होत आता लोक फेसबुक, व्हॉट्सअॅप, ट्विटर, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियांच्या माध्यमातून एकमेकांना एप्रिल फूल करीत आहेत. आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एप्रिल फूल करून त्यातून मिळणारा आनंद हा क्षणिक असला तरी तो आजच्या धकाधकीच्या जीवनात मोलाचा आहे. दुसऱ्यांना एप्रिल फूल बनवताना प्रत्येकाने स्वतःमधील वाईट प्रवृत्तीलाही एप्रिल फूल बनवावे. दररोज उशिरा उठण्याच्या सवयीला लवकर उठून व्यायाम करून एप्रिल फूल करावे. दररोज मोबाईल वापराच्या सवयीला एप्रिल फूल करून एखादे छानसे पुस्तक वाचावे. सर्वांशी जिव्हाळ्याने वागून आपल्यातील अहंकाराला एप्रिल फूल करावे. गरजवंताला मदत करून स्वार्थाला एप्रिल फूल करावे. मोठेपणाला एप्रिल फूल करून लहान मुलांशी खेळावे. स्वतःच्या मी पणाला एप्रिल फूल करुन आम्ही बनून समाजात वावरल्यास एकमेकांविषयी असलेली कटुता कमी होईल आणि प्रत्येकाला जीवनाचा आनंद घेता येईल.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## प्रबोधन

# नित्य नवे काही । हवे समाजाला

गुढीपाडवा या सणाला कानडीमध्ये युगादि असं म्हटलं जातं. युगादि हा शब्द गुढीपाडवा या शब्दापेक्षा अधिक सार्थ, अर्थवाही आहे. युगादि म्हणजे वर्षारंभ. गुढीपाडवा म्हणजे गुढी उभी करण्याची प्रतिपदा. भारतात हा सण हजारो वर्षांचा जुना आहे. कारण प्रतिपदाचं लोकभाषेत पाडवा असं रूपांतर व्हायला खूप वर्ष लागतात. भारतात ख्रिस्ती कालगणना इंग्रजांनी आणली. आपण त्यांच्या जानेवारीपासून वर्षारंभ मानू लागलो. पण अठराव्या शतकापूर्वी चैत्र हाच भारतीय कालगणनेचा प्रारंभ होता. ही कालगणना शालिवाहन राजाने सुरू केली. राजा विक्रमादित्याने विक्रमसंवत सुरू केला. छत्रपती शिवरायांनी सन १६७४ या आपल्या राज्याभिषेकाच्या वर्षापासून आपली कालगणना शिवशक या नावाने सुरू केली म्हणून त्यांना शककर्ते हे नामाभिधान प्राप्त झालं. त्यानंतर भारतात पारशी लोक आले. त्यांचं पारशी नव वर्ष सुरू झालं. त्यामुळे नूतन वर्षाभिनंदन हा शब्द निदान आपल्या देशात तरी केव्हाही वापरला तरी चालतो.

पूर्वी पराक्रमी राजांचं स्वारीवरून राजधानीत आगमन झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ गुढीतोरणे उभारली जात. दारापुढे गुढी आणि दारावर फुलांच्या माळांचं तोरण हा नागरिक प्रजेने प्रकट केलेला आनंद होता. राजपुत्राचा जन्म, राजकन्येचा विवाह, राजघराण्यात आलेले खास पै-पाहुणे अशा कोणत्याही प्रसंगी गुढ्या तोरणं उभारली जात. राजेशाहीच्या अस्ताबरोबर चैत्र प्रतिपदेची गुढीच काय ती फक्त शिल्लक राहिली. पण वास्तविक आजसुद्धा १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, महात्मा गांधी जयंती, फुले-शाहू-आंबेडकर जयंती अशा राष्ट्रीय दिनांचा आनंद गुढ्या-तोरणं लावून, राष्ट्रध्वज फडकावून प्रदर्शित करायला हरकत नाही. पण जुन्या रूढींना नवे संदर्भ जोडणं आपणाला जमलेलं नाही. त्यामुळे जुनं अर्थहीन आणि नवं उदासीन होऊन राहिलं आहे.

गुढी हे आनंद प्रदर्शनाचं साधन आहे. तो देव नव्हे. लोक गुढीला देव समजून तिची पूजा करतात, आरती ओवाळतात, नारळ फोडतात, उदबत्ती ओवाळून नैवेद्य दाखवतात हे सर्व हास्यास्पद आहे. भारताचा राष्ट्रध्वज तिरंग्याला अजून तरी नैवेद्य कुणी दाखवत नाही. पण राष्ट्राभिमानावर धर्माभिमानाची कुरघोडी झाली, तर राष्ट्रप्रमुख भविष्यकाळी ध्वजारोहण समंत्रक पूजेने करून नैवेद्य दाखवून पुरोहिताला दक्षिणाही देतील. तोही दिवस फार लांब नाही, असंच या देशाचं सध्याचं वातावरण आहे. वास्तविक, चैत्र शुद्ध प्रतिपदेचा संपूर्ण दिवस हा शुभदिवसच असतो, असं परंपरा सांगते. पण समाजाला एवढं स्वातंत्र्य दिल्यावर भटजीचे पोट कसं भरेल? म्हणून त्यातही गुढी उभारण्याचा मुहूर्त सांगण्याची टूम भट- भिक्षुकांनी काढली आणि सामान्य लोक त्यांना दक्षिणा देऊन शुभ वेळ विचारू लागले. डोकं चालवा, दक्षिणा मिळवा असा हा भटी संप्रदाय आहे ! तो समूळ उखडून टाकण्यासाठी सामान्यबुद्धी वापरा (common sense) आणि दक्षिणा वाचवा, असा प्रकार समाजात का मूळ धरू नये?

गुढीपाडवा हा सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत उत्तम दिवस असून चांगली कामं या दिवशी सुरू करण्याची पद्धत लोकांत रूढ आहे. अर्थात, योग्य नियोजन आणि भक्कम तयारी नसताना केवळ शुभ मुहूर्त म्हणून गुढीपाडव्या दिवशी सुरू केलेली कित्येक कामं अर्धवट अवस्थेतच कायमची राहून गुढीपाडव्याच्या मुहूर्ताविषयी साशंकता निर्माण करतात. त्यात गुढीपाडव्याचा काय दोष! खरं तर, कुशल नियोजन आणि साधनांची अनुकूलता असल्यास शुभदिवस आणि मुहूर्त हवाच कशाला? शहाणी माणसं शुभस्य शीघ्रम - अर्थात, चांगलं काम असेल तर ते केव्हाही (अगदी अमावास्या-पौर्णिमा अशा त्याज्य मानलेल्या दिवशीसुद्धा) करायला हरकत नाही, असं सतत म्हणतात, ते काही खोटं नाही. पण शुभमुहूर्त म्हणून गुढीपाडव्या दिवशी काम सुरू करायचं आणि बेजबाबदारपणे ते अर्धवट ठेवून उत्तर भारतवासीयांकडून आरंभशूराः खलु दाक्षिणात्यः -अर्थात, 'हे दक्षिण भारतीय लोक खरोखर आरंभशूरच आहेत,' अशा निर्भर्त्सनेला पात्र व्हायचं, हे काही चांगलं नाही.

निवडणूक प्रक्रियेतील तारखांचा आणि गुढीपाडव्याचा जर मेळ बसला, तर सनातनी वृत्तीचे अनेक लोकप्रतिनिधी तो दिवस नक्की साधतील. पण तो दिवस सर्वांनी साधला म्हणून का तो सर्वांना लाभेल? शक्यच नाही. याला भाबडेपणा म्हणा अगर अंधविश्वासूपणा म्हणा किंवा सनातनीपणा म्हणा. जे घडेल ते तांत्रिकपणाचा (तांत्रिकविद्येचा नव्हे!) भाग असेल. पण आज ज्योतिष कार्यालयाच्या आणि बुवा-बाबांच्या मठांच्या फेऱ्या लोकप्रतिनिधीपदाच्या इच्छुक उमेदवाराकडून मोठ्या प्रमाणात घातल्या जात आहेत, हे खरं!

जुने सणवार, जुनं परंपरा प्रेम, जुन्या पूजाअर्चा, यातून बाहेर पडून त्या जुन्या रीतिरिवाजांना कालानुरूप कसं नवं रूप देता येईल, याचा विचार जोपर्यंत आपण करीत नाही, तोपर्यंत राष्ट्रजीवनात सणवार- उत्सवांनी जी खळबळ माजेल, ती वरवरची असेल. अंतःकरण आणि मेंदू यांना मान्य होणारं रूप उत्साह आणि कल्पकता याशिवाय देता येतच नसतं आणि आपणामध्ये तर याच सद्गुणाचा अभाव आहे. तो दूर करण्यासाठी लक्षात ठेवा-

शुभस्य शीघ्रम। हे वाक्य थोर अति
त्यापुढे न महती। मुहूर्ताची ॥ १
थोर संकल्पला । प्रयत्न जोडावे
यश मिळवावे । उज्ज्वलसे ॥ २
कायार्ची पूर्तता । साधते ध्यासाने
केवळ चिंतेने । काय लाभ? ॥३
कायार्चा प्रारंभ हाच खरा सण
उत्साह उधाण। जेव्हा येई ॥४
रूढीच्या गुढीचा । अर्थ विसरून
गुढी उभारून । काय लाभ? ॥५
गुढीपाडव्याचा मुहूर्त साधाया
कधी शिवराया। थांबला का ?`६
नित्य नवे काही। हवे समाजाला
कळे जाणत्याला । मर्म त्याचे ॥७
मनामध्ये गुढी। रोज उभारावी
कार्ये नवी नवी । घ्यावी हाती ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी सागरी व्यापार क्षेत्राचा समग्र विकास आवश्यक - राज्यपाल सी पी राधाकृष्णन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** जगातील ९०% व्यापार आजही सागरी मार्गाने होतो. समुद्र मार्गाने होणारा व्यापार हा भारतीय व्यापार तसेच अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे सन २०४७ पर्यंत विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी सागरी क्षेत्राचा समग्र विकास होणे अतिशय आवश्यक आहे असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

सागरी व्यापार क्षेत्रातर्फे साजरा केल्या जाणाऱ्या ६२ वा राष्ट्रीय सागरी दिवसाचे तसेच मर्चंट नेव्ही सप्ताहाचे उद्घाटन राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन येथे झाले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी नौवहन महासंचालक श्याम जगन्नाथन यांनी राज्यपालांच्या जॅकेटला राष्ट्रीय सागरी दिनाच्या ध्वजाची प्रतिकृती लावली तसेच राज्यपालांना स्मृतिचिन्ह व कॉफी टेबल पुस्तक भेट दिले.

अनेक शतकांपूर्वी भारताचा समुद्री व्यापार क्षेत्रात मोठा दबदबा होता. सम्राट राजेंद्र चोला यांचे नौदल शक्तिशाली होते व आपल्या काळात त्यांनी इंडोनेशिया, कंबोडिया, थायलंड, लाओस, बर्मा आदी देशांपर्यंत व्यापार वाढवला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी नौदलाचे महत्त्व ओळखून सशक्त नौदल उभारले होते, असे राज्यपालांनी सांगितले.



आज व्यापाऱ्यांना कमी वेळात आपला माल गंतव्य ठिकाणी पोहोचवायचा असतो. ग्राहक हा आज राजा आहे. त्यामुळे कंटेनरमध्ये माल ठेवणे व उतरवणे हे वेळेत झाले पाहिजे. या दृष्टीने नौवहन संचालनालय व शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी कंटेनर कॉर्पोरेशन, रेल्वे तसेच व्यापारी संघटनांशी चर्चा करून सागरी व्यापार क्षेत्राचे आधुनिकीकरण केले पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

नौवहन संचालनालयाने व्यापारात अडथळे निर्माण होण्यापूर्वीच समस्यांचे आकलन केले पाहिजे व त्यावर परिणामकारक उपाययोजना केल्या पाहिजे, अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.

वाढवण बंदर तयार झाल्यानंतर भारताचा जगातील विविध देशांशी व्यापार लक्षणीय वाढणार आहे. त्यामुळे वाढवण बंदर येथे कोणत्या सुविधा असाव्या या दृष्टीने नौवहन क्षेत्राने सिंगापूर, शांघाय, मस्टरडॅम येथील बंदरांचे अध्ययन करावे व त्यानुसार येथे आधुनिक सुविधा निर्माण कराव्या, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

## वात्रटिका

### घ्या वाजवून

कोणाला मिळते सोने
तर कोणाची आहे चांदी...
सरकारी आश्वासन रोज
पण देते काही कधीमधी...
कर्ज माफी विसरून जा
त्यांनीही मारला शिक्का...
कोणाला चंदन लागले तर
कोणाला लागला बुक्का...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# आदिनाथच्या निवडणुकीमधून बागल गट दूर राहणार

## गटाचे मार्गदर्शक घुमरे यांनी स्पष्ट केली भूमिका





**करमाळा(कटुसत्य वृत्त):-** निवडणूक प्रक्रिया सुरू असलेल्या शेलगाव - भाळवणी येथील श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याची निवडणूक न लढविण्याचा निर्णय वागल गटाने घेतला आहे. वागल गटाकडून अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांनी अर्ज माघारी घेण्यावावत सांगण्यात आले असून वागल गटाचा हा निर्णय या निवडणुकीवर वेगळा परिणाम करणार हे स्पष्ट झाले आहे.

आदिनाथवावत बागल गटाचे मार्गदर्शक विलासराव घुमरे यांनी भूमिका मांडली. गटाच्या समर्थकांची तसेच अर्ज दाखल केलेल्या समर्थक उमेदवारांची विचारविनिमय वैठक पार पडली. यावेळी घुमरे यांनी कारखाना निवडणूक लढावायची नाही, असे स्पष्ट केले. याप्रसंगी शिवसेना नेते मकाईचे माजी चेअरमन दिग्विजय वागल उपस्थित होते.

याप्रसंगी भूमिका मांडताना घुमरे यांनी, बागल गटाला राजकीयदृष्ट्या अडचणीत आणण्यासाठी सातत्याने, आतापर्यंत श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याला लक्ष्य केले गेले आहे. पुन्हा असा प्रकार आदिनाथच्यावावतीत होऊ नये, यासाठी कारखान्याच्या निवडणुकीसाठी वागल गटाने थावण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या वीस वर्षांमध्ये वागल गटाच्या राजकारणाला अडचणीत आणण्यासाठी आदिनाथ कारखान्याला अडचणीत आणले गेले.

आदिनाथ सुरळीत चालावा, ही आमची प्रामाणिक इच्छा आहे. पुन्हा वागल गटाला अडचणीत आणण्यासाठी कारखान्याला अडचणीत आणले जाऊ नये. यासाठीच आम्ही या निवडणुकीत थांवण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही फक्त निवडणुकीपुरते थांवलो आहोत. आदिनाथ व्यवस्थित चालण्यासाठी आमचे योगदान सातत्याने असेल, जो कोणी आदिनाथच्या सत्तेवर येईल त्याला वागल गटाचे सहकार्य राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी आदिनाथ निवडणुकीच्या संदर्भात निर्णय घेण्याचे सर्व अधिकार वागल गटाच्या नेत्या व भाजप महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा व साखर संघाच्या संचालिका रश्मी वागल व गटाचे मार्गदर्शक विलासराव घुमरे यांना देण्यात आले असून ते जो निर्णय घेतील तो मान्य करण्याचे यावेळी ठरले. यावेळी वाजार समितीचे माजी सभापती प्रा. शिवाजीराव वंडगर, माजी उपसभापती चिंतामणी जगताप, आदिनाथचे माजी चेअरमन धनंजय डोंगरे, कल्याणराव सरडे, रणजीत शिंदे, अंगद पाटील, केरू गव्हाणे, ॲड. नानासाहेव शिंदे हे गटाचे समर्थक उपस्थित होते.

# शासकीय कार्यालये खासगी जागेत सुरु

## जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयातील अनेक इमारती धूळ खात पडून



**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** शहरातील जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयासह अनेक शासकीय इमारती या धूळ खात पडून आहेत. मात्र, शहरातील अनेक शासकीय कार्यालये या खासगी इमारतीमध्ये भाडेतत्त्वावर चालविले जातात. स्वतःची जागा असूनही भाड्याने चालविण्याचे कारण काय माहिती नाही. यामुळे शासनाच्या पैशांचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे.

सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण, जिल्हा महिला बाल कल्याण अधिकारी, उपप्रादेशिक अधिकारी प्रादेशिक प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा खादी ग्रामोद्योग, जिल्हा रेशीम अधिकारी, सहायक संचालक नगररचना, परिमंडळ ड, विद्युत निरीक्षक, जिल्हा ग्रंथालय अधिकारी, सहायक निबंधक दक्षिण सोलापूर, सहायक निबंधक शहर यासह अन्य राज्य सरकारचे विविध विभागाचे कार्यालये हे भाड्याच्या इमारतीत सुरू आहेत. यातील काही कार्यालये शोधूनही नागरिकांना सापडत नाहीत.

ग्रामीण भागातील एखाद्या नागरिकाला सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण आणि जिल्हा महिला बाल कल्याण अधिकारी या कार्यालयांत शोधताना नाकी नऊ येतो. यामुळे, कोणत्या घटकासाठी कोणत्या योजना आहेत. याची माहिती होत नाही. हे कार्यालय गजबजलेल्या ठिकाणी असणे आवश्यक आहे.

जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील अप्पर जिल्हाधिकारी, पुनर्वसन अधिकारी यासह अन्य अधिकाऱ्यांचे कार्यालय हे सध्या धूळ खात पडलेली आहेत. केवळ, अधिकारी यांच्या सोयीसाठीच हे कार्यालय अद्यापही खासगी जागेत चालू असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. शिवाय, हे कार्यालय जर जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील कार्यालयात चालू झाले तर शहरासह ग्रामीण भागातील लोकांना महिला बालकल्याण, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयातील नागरिकांसाठीच्या योजना कळतील. व या योजनांचा फायदा लोकांना होण्यास मदत होतील. तसेच, नागरिकांवर हे कार्यालय शोधण्याची वेळ येणार नाही. तसेच यामुळे दरमहिना खासगी इमारत मालकांना भाड्यापोटी दिले जाणारे हजारो रुपये वाचतील. शासकीय कार्यालयाच्या जागा वारंवार बदलत असल्याने नागरिकांना ते कार्यालय वेळेवर सापडत नाही. त्यामुळे त्यांचे हेलपाटे होतात, याचा त्रास नागरिकांना होतो.

# संतोषकुमार महामुनी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** पंचायत समिती माळशिरस शिक्षण विभाग यांच्याकडून दिला जाणारा सन -२०२४-२५ च्या तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा वितरणाचे आयोजन पंचायत समिती सभागृह माळशिरस या ठिकाणी उत्साहात संपन्न झाले. सदर कार्यक्रमामध्ये इस्लामपूर केंद्रातील जि. प. प्राथ.शाळा, शेरीवस्ती शाळेचे शिक्षक संतोषकुमार हरी महामुनी यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. माळशिरस तालुक्याचे आमदार उत्तमराव जानकर, पंचायत समिती माजी सभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील, इस्लामपूर गावचे युवा नेतृत्व जिल्हा परिषद सदस्य तथा अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान संचालक लक्ष्मण तात्या पवारसाहेब,पंचायत समिती सदस्य अजय सकट, तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रदीप करडे, विस्ताराधिकारी सुषमा महामुनी या मान्यवरांच्या हस्ते हा आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यासाठी इस्लामपूर केंद्राचे केंद्रप्रमुख आ.ल. खरात सर आणि बापू हाके, कण्हेर गावचे सरपंच बाजीराव माने, अकबर शिकलगार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आण्णा होनमाने, विकासनाना धाईजे, गोरड, केंद्रातील सर्व मुख्याध्यापक शिक्षक उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत या आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्याचे वितरण पंचायत समिती सभागृह माळशिरस या ठिकाणी करण्यात आले. केंद्रातील सर्व शिक्षक बांधव, सर्व मित्रमंडळी आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाने हा आदर्श शिक्षक पुरस्कार आपणास मिळाला.तसेच आजपर्यत सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याने हा पुरस्कार आपल्याला सर्वांच्या सहकार्याने मिळाल्याचे महामुनी यांनी सांगितले.

# सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार : सावंत

## अनिल सावंत यांच्या मंगळवेढा तालुक्यातील जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन



**नंदेश्वर / (कटुसत्य वृत्त):-** मंगळवेढा तालुक्यातील महाविकास आघाडी एकसंघ ठेवत सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी जनसंपर्क कार्यालयातून प्रयत्न होणार असल्याचे मत भैरवनाथ शुगरचे व्हा. चेअरमन अनिल सावंत यांनी व्यक्त केले. शिवप्रेमी चौक, मंगळवेढा येथे अनिल सावंत यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

व्यासपीठावर माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, प्रांतिक सदस्य राहुल शहा, श्री. संत दामाजी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष ॲड.नंदकुमार पवार, शिवसेना तालुकाप्रमुख प्रा.येताळा भगत, शहरप्रमुख दत्तात्रय भोसले, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष प्रथमेश पाटील, शिरणांदगीचे सरपंच गुलाब थोरबोले, पं. स. माजी सदस्य नितीन पाटील, शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडूभैरी, कार्याध्यक्ष संतोष रंधवे, फिरोज मुलाणी, चंद्रकांत गरंडे, पैलवान दामोदर घुले, नारायण गोवे, दामाजी शुगरचे माजी संचालक बळवंत पाटील, सुरेश कांबळे, सुदर्शन महाराज, स्मिता अवघडे, नागणे, सावजी आदीजन उपस्थित होते.

अनिल सावंत पुढे बोलताना म्हणाले की, जनतेच्या सुख दुःखात आम्ही कायम सोबत असणार आहोत. येणाऱ्या काळात आम्ही सर्व मिळून मिसळून जनतेची कामे मार्गी लावणार आहोत. राहुल शहा बोलताना म्हणाले, गेल्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत मोठ्या ताकदीने आम्ही लढत दिली आहे. आगामी नगरपालिका, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुका सर्वांनी मिळून लढायच्या आहेत. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड. राहुल घुले यांनीही मनोगत व्यक्त केले.

# हिळ्ळी बंधारा पुन्हा एकदा कोरडा

## चार दिवस पुरेलइतकेच पाणी शिल्लक; शेतकरी हवालदिल



**अक्कलकोट, (कटुसत्य वृत्त):-** तालुक्यातील हिळ्ळी बंधाऱ्यात केवळ चार दिवस पुरेल इतकेच पाणी सध्या शिल्लक आहे. ऐन उन्हाळ्यात हिळ्ळी वंधारा पुन्हा एकदा कोरडा पडल्याने ग्रामस्थ व भीमानदी काठावरील सीमावर्ती भागातील शेतकरी व नागरिक हवालदिल झाले आहेत.

या वर्षी उजनी धरण ११० टक्के भरल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. या भागातील शेतकरी कर्ज काढून व उसनवारी करुन महागडे ऊस रोपे विकत घेऊन ऊस पिकांची लागवड केली होती. मात्र, सध्या पाण्याअभावी डोळ्यादेखत पिके जळून जात असल्याने या भागातील शेतकरी चिंतातुर झाला आहे. शेतकऱ्यांनी जे स्वप्न पाहिले होते ते स्वप्न आता सध्या धुळीस मिळत असल्याचे पाहायला मिळत आहे. उजनी धरणातून भीमानदीत १० मार्चला पाणी सोडणे अपेक्षित होते. परंतु, कालव्यातून सिंचनासाठी भरमसाठ पाणी सोडून दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यांतील गावे वंचित ठेवली.

आता उजनी धरणाची पातळी ३० टक्क्यांपर्यंत गेली आहे. अद्यापही सिंचनासाठी ४ हजार क्युसेकचा विसर्ग सुरुच आहे. उजनी धरणातील पाणी फक्त शहरी भागांसाठीच आहे की काय, प्रश्न ग्रामीण भागातील जनतेला पडला आहे. आता प्रशासन व लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष घालून तत्काळ उजनी धरणातील पाणी हिळ्ळी बंधाऱ्यापर्यंत सोडून या भागातील शेतकरी व सामान्य नागरिकांना दिलासा देण्याची मागणी हिळ्ळी गावचे सरपंच आप्पासाहेव शटगार व परिसरातील शेतकरी बांधवातून जोर धरत आहे.

**दोन महिने काढायचे कसे ?**

हिळ्ळी बंधाऱ्यातील पाण्याच्या जोरावरच या भागातील शेतकऱ्यांची शेती अवलंबून आहे. या बंधाऱ्याच्या भरोशावरच या भागातील बहुसंख्य शेतकरी बागायत शेती पिकाचे नियोजन करत असतात. परंतु, यंदा मात्र या भागातील शेतकऱ्यांचे शेती नियोजन पुरते फसल्याचे बोलले जात आहे. कारण हिळ्ळी बंधारा अचानक तळ गाठल्याने पुढचे एप्रिल आणि मे हे दोन महिने काढायचे कसे, असा सवाल या भागातील नागरिक प्रशासनाला करत आहेत.

# देवगड हापूस आंब्यांवर आता युनिक आयडी कोड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** देवगड हापूस आंब्याच्या नावाने होणारी तोतयागिरी आणि बनावट आंब्यांची विक्री रोखण्यासाठी देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे.या वर्षीपासून प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर 'टॅपर प्रूफ युआयडी सील' (TP Seal UID) सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती महेश धाराशिवकर आणि शशी थोरात यांनी पत्रकार परिषदेत दिली.

देवगड अल्फोन्सो (हापूस) आंब्याच्या नावाने बाजारात होणारी तोतयागिरी आणि बनावट आंब्यांची विक्री रोखण्यासाठी 'हापूस (अल्फोन्सो) च्या भौगोलिक संकेत (GI) टॅगची रजिस्टर्ड प्रोप्रायटर असलेल्या देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने या वर्षीपासून प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर 'टॅपर प्रूफ युआयडी सील' (TP Seal UID) सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यामुळे आता प्रत्येक अस्सल देवगड हापूस आंब्यावर हा खास TP Seal UID स्टिकर लावणे बंधनकारक असेल आणि असे युआयडी असलेले आंबेच 'देवगड हापूस' किंवा 'देवगड अल्फोन्सों म्हणून विक्री किंवा विपणन करता येणार आहे. या उपक्रमामुळे देवगड हापूसच्या नावाखाली सर्रास होणारी बनावट आंब्यांची विक्री पूर्णतः बंद होतील आणि ग्राहकांना केवळ जीआय प्रमाणित, अस्सल देवगड हापूस आंबेच मिळतील असा संस्थेचा विश्वास आहे.

गेल्या तीन दशकांपासून इतर भागांतील निकृष्ट दर्जाचे आंबे सर्रास देवगड हापूस म्हणून विकले जात आहेत. त्यामुळे देवगडमधील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, त्याचे गंभीर सामाजिक दुष्परिणाम देखील होत आहेत.या प्रकल्पाकरिता टिपी सील यूआयडीचे पेटंट असलेल्या संस्थेने मुंबई स्थित सन सोल्यूशन्स संस्थेबरोबर करार केला आहे असे महेश धाराशिवकर आणि शशी थोरात यांनी सांगितले.

**जाहीर प्रसिध्दीकरण** दि. क्रि. अर्ज नं.२३६/२०२५

**सोलापूर मे.येथील सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हिजन यांचे कोर्टात**

१) माळप्पा नामदेव ईश्वरकट्टी वय - ३३ वर्षे, धंदा- मजूरी २) तिपण्णा नामदेव ईश्वरकट्टी वय-३२ वर्षे, धंदा-मजूरी दोघे रा.२११ महाराणा प्रताप झोपडपट्टी शांती निकेतन शाळेजवाळ कुमठा नाका सोलापूर ३) नागव्वा संतोष संकपाळ (लग्ना नंतर) नागव्वा नामदेव ईश्वरकट्टी (लग्ना पूर्वी) वय - ३१ वर्षे, धंदा घरकाम रा. ५९ जवळकर वस्ती सम्राट चौक सोलापूर } **अर्जदार**

**विरूध्द**

कोणी नाही } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात वॉम्वे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणेसंबंधीचा अर्ज दाखल केला आहे.अर्जदार नं. १ ते ३ यांची आई नामे शशिकला नामदेव ईश्वरकट्टी हे दि.०८/०७/२०२४ रोजी सोलापूर येथे निधन झाले आहे. त्यांचे नावे डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर पैकी ता उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील नवीन हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील महाराणा प्रताप झोपडपट्टी मधील म्युनिसिपल झोपडी नं/ घर नं: २११ लगत यांसी महानगरपालिका मिळकत क्र. ६५३८१९ याचे ऐकूण क्षेत्र ५०० चौ. फुट इतके असून यामध्ये दोन पत्राशेड खोली असून वाकीची खुली जागा आहे. ही मिळकत असून अर्जदारांचे नांवे मिळकतीचे रेकॉर्डला म्हणजेच मिळत दप्तर सदरी धारक नांवाची नोंद होणेकरिता अर्जदार यांनी त्यांचे नांवे वारसा दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणेकरिता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थीसदर अर्जाचे कामी कोणाची काही हरकत अथवा म्हणने असल्यास ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत किंवा नेमलेली ता.२९/०४/२०२५ रोजी स्वतः अथवा व वकीला मार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची ही हरकत न आल्यास, कोणाची ही हरकत नाही, असेसमजून या अर्जाची चौकशी होवून मे. कोर्ट पुढील योग्यते आदेश करतील.आज दि.२८ माहे ०३ २०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.-------

**लिपिक** (शिक्का) **हुकुमावरुन सह अधिक्षक**

# शिक्षकांनी राजकीय जोडे बाजूला ठेवून प्रामाणिकपणे काम करावे

## आमदार राजू खरे; तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण



**पोखरापूर (कटुसत्य वृत्त):-** शिक्षण क्षेत्रात राजकारण येता कामा नये, शिक्षकांनीही राजकीय जोडे बाजूला ठेवून शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करून विद्यार्थी घडविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन आमदार राजू खरे यांनी केले.

पंचायत समिती शिक्षण विभागातर्फे वडवळ (ता. मोहोळ) येथील श्री नागनाथ सांस्कृतिक भवन येथे आयोजित तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण कार्यक्रमात आमदार खरे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख होते.. यावेळी सहा. गटविकास अधिकारी देशमुख, गटशिक्षणाधिकारी अविचल महाडिक, शिक्षण विस्तार अधिकारी मल्लिनाथ स्वामी, बंडू शिंदे, केंद्रप्रमुख राजकुमार राऊत, रूपेश क्षीरसागर, श्री नागनाथ देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष श्रीकांत शिवपुजे, शाहू धनवे, सुनील पाटील आदी उपस्थित होते. आमदार खरे पुढे म्हणाले, ज्या क्षेत्रात आपण काम करतो आणि त्या क्षेत्रातील आदर्श असा पुरस्कार मिळणे ही बाब अभिमानाची गोष्ट असते. त्यामुळे या पुरस्कारांमध्ये कोणताही राजकीय हस्तक्षेप नसावा. ते पुरस्कार गुणवत्तेप्रमाणे असावेत.

यापुढील काळात मोहोळ तालुक्यात शिक्षण क्षेत्रात राजकारण चालणार नाही. शिक्षण क्षेत्रात राजकारण आले तर त्याचे बाजारीकरण होईल. त्यामुळे शिक्षकांनी राजकीय जोडे बाजूला ठेवून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रयत्न करावा. जि.प. शाळांना पायाभूत सुविधा देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिक्षणाधिकारी कादर शेख म्हणाले, या पुरस्कार सोहळ्यामुळे शिक्षकांना अधिक प्रेरणा मिळेल. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी हे हक्काने शाळेत येतात. त्यांना संस्कार देऊन त्यांचे मन आणि मनगट बळकट करून शैक्षणिक प्रगती करावी. शाळेत काम करताना शिक्षकांनी कोणतेही मतभेद ठेवू नये. जिल्हा परिषद शाळांचा दर्जा व नावलौकिक समाजात वाढवण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत. प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी महाडिक यांनी केले. सूत्रसंचालन महादेव माने यांनी तर मल्लिनाथ स्वामी यांनी आभार मानले.

**Classified - छोटी जाहीरात**

**विकणे आहे**

- सोलापूर - अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे
- गुळवंची - कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.
- सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे

मो. 9860848471/ 7741077411

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

प्रोप्रा. हरी सुभाष विरपे

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)



**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**

फोन: 9552619752

कॉल/व्हॉटस्‌ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...

501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) सेनापतीस या नावाने संबोधत असत २) आश्चर्य ३) वृक्षाचे पर्ण ४) एक म्हण - *** तोंडी मोठा घास ५) अवघड (इंग्रजीत) ६) नो च्या विरूध्दार्थी इंग्रजी शब्द ७) एक जुना खेळ - ** पारंब्या ८) देव १३) चोहोबाजूंनी पाणी असलेला भूभाग १४) धनुष्यबाण १५) सीतापती १९) बुडत्याला काडीचा *** २०) भारताचे सध्याचे राष्ट्रपती २१) डोकेदुखीवरील मलम २२) ढगांचा होणारा आवाज २१) शेत परिसर २४) प. महाराष्ट्रातील क्रांतीकारी जिल्हा २६) चित्रपटसृष्टीत दिला जाणारा एक पुरस्कार - ***** फाळके २९) अजय देवगणचा एक चित्रपट ३०) किल्ला ३१) खा. सुप्रिया सुळे यांचा मतदारसंघ ३३) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो ३५) वडाभोवती बसण्याचा बांधीव कट्टा ३७) निकड, आवश्यकता ४०) विषमच्या विरूध्दार्थी ४१) गवताचे ओझे ४३) कासवाची आणि याची गोष्ट प्रसिध्द आहे ४४) धातूचा तंतू.

**आडवे शब्द :** १) राजस्थानचे युवा नेते ५) छ. संभाजीराजांच्या पत्नीचे नाव ९) एक (इंग्रजीत) १०) अर्धा (इंग्रजीत) ११) शिक्षकांना या नावाने संबोधतात, फटाक्यांची माळ १२) विविध क्षेत्रात अदभूत कार्य करणाऱ्या व्यक्तीस दिले जाणारे आंतरराष्ट्रीय पारितोषिक १४) दोन नंतरची संख्या १६) आई (इंग्रजीत) १७) कपाळावर येणारा केसांचा झुपका, परंतु (इंग्रजीत) १८) बे दुणे १९) आंब्याची बाग २२) रवा २४) एखाद्यास वश करण्याचे उपाय- ** ** दंड भेद २५) मोहरा चित्रपटातील अभिनेत्री २६) दानशूर २७) मुंबईलगतचा एक जिल्हा २८) जुन्या रामायण सिरिजमध्ये हनुमानाची भूमिका करणारा अभिनेता ३१) पत्नी, सहचारिणी ३२) खेळाची पाळी ३४) केळांचा घस ३५) तापमान दर्शविण्यासाठी तापमापकामध्ये हा वापरतात ३६) १००० कि.ग्रॅ. म्हणजे एक ** ३७) उष्ण ३८) पाच दुणे ३९) एसटीची प्रवासी गाडी ४१) थंड ४२) पंधरा दुणे ४४) साठ मिनिटांचा वेळ म्हणजे एक ** ४५) राजांना या नावाने संबोधतात ४६) कर्जाऊ पैसे देणारा.

## सुडोकु - 214

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | | | | 9 | 6 | |
| 7 | | 3 | 4 | | | | | 5 |
| | 2 | | | | 1 | | | 4 |
| | | | 8 | 3 | | 4 | | 6 |
| | 9 | 6 | | | | | 1 | |
| | | 4 | 1 | | 6 | 7 | 5 | 3 |
| | 7 | 2 | 9 | 8 | | 5 | | |
| 8 | | 1 | | | 7 | | 4 | |
| 5 | | | | 1 | 3 | 8 | 2 | 7 |

# १ कोटीच्या बंगल्याचा मालक, विमानाने यायचा चोरी करायला, सोलापूरमध्ये फसला डाव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी एका हायप्रोफाईल चोराच्या मुसक्या आवळल्या आहेत. हा संशयित चोरी करण्यासाठी विमानाने प्रवास करत होता. या आंतरराज्य चोरट्याच्या मुसक्या शहर गुन्हे शाखेच्या पथकाने आवळल्या आहेत. संशयितावर विविध राज्यात ३५ गुन्हे दाखल आहेत, सध्या तो न्यायालयीन कोठडीत आहे. वेळ वाचवण्यासाठी तसेच चोरी करुन एका राज्यातून दुसऱ्या राज्यात पळून जाण्यासाठी तो विमान प्रवास करत असल्याची माहिती समोर आली आहे. अनिलकुमार मिस्त्रीलाल राजभर (वय ३८, रा. बोदरी, ता. केराकत, जि. जौनपूर उत्तर प्रदेश) असे हायप्रोफाईल चोरट्याचे नाव आहे.



सोलापूर पोलिसांनी पकडून त्याच्याकडून घरफोडीचे दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. गुन्हेगाराकडून पोलिसांनी ११० ग्रॅम सोन्याचे व ११३ ग्रॅम चांदीचे दागिने असा ९ लाख रुपये किंमतीचा ऐवज जप्त केला आहे. त्याच्याकडून जेलरोड पोलिस व नाशिक जिल्ह्यातील सिन्नर पोलिस ठाण्यातील गुन्हा उघडकीस आला. संशयित चोरट्याने १० मार्च रोजी प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख (रा. फ्लॅट नं. ६०२, सेंटर पार्क अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, सोलापूर) यांचे घर फोडून १० तोळे सोने चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास केली होती.

अनिलकुमार या संशयितावर महाराष्ट्र राज्यात विविध शहरात चोरीचे गुन्हे दाखल आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार हा अनिलकुमार हायप्रोफाईल सराईत गुन्हेगार आहे. उत्तर प्रदेश, जौनपूर या ठिकाणी अलिशान बंगला आहे. अनिलकुमार याचा जवळपास एक कोटीचा बंगला आहे. गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये मिळून दिवसा घरफोडीचे ३५ गुन्हे दाखल आहेत.

**पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी आवळल्या मुसक्या**

अनिलकुमारने सोलापुरात दिवसा घरफोडी केली होती. आणखी एक घरफोडी करून निघून जाण्याच्या बेतात होता, त्यापूर्वीच त्यास तांत्रिक माहितीच्या आधारे ताब्यात घेण्यात आले. सहाय्यक पोलिस निरीक्षक शैलेश खेडकर, गुन्हे शाखा यांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने घरफोडी केल्याचे कबूली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत केले. अनिलकुमारला सोलापूर शहरातील जेलरोड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# सांगोल्यात कोसळला ८०० किलो वजनाचा टेलिस्कोपः जीवितहानी नाही, कारचे नुकसान

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** हैदराबाद येथून टाटा मूलभूत संशोधन केंद्राने खगोलशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी सोडलेला ८०० किलो वजनाचा टेलिस्कोप (दुर्बीण) पॅराशूटसह रविवारी सकाळी सहाच्या सुमारास अचानक सांगोला शहरातील मानवी वस्ती पडल्याने एकच खळबळ उडाली.

अचानक वाऱ्याची दिशा बदलामुळे हे उपकरण मानवी वस्तीत कोसळले असले तरी यामुळे जीवितहानी मात्र झाली नाही. एका कारचे मोठे नुकसान झाले.

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फांडामेंटल रिसर्च सेंटर (टीआयएफआर) बलून फॅसिलिटी नॅशनल सेंटर ऑफ गर्व्हमेंट ऑफ इंडिया शाखा हैदराबाद या संशोधन केंद्राकडून अवकाशातील ताऱ्यांची



नोंद घेण्यासाठी शनिवार रात्री ९ च्या सुमारास पॅराशूट व बलूनच्या सहकार्याने टेलिस्कोप (दुर्बीण) अवकाशात २५ कि.मी. अंतरावर सोडले होते.

या टेलिस्कोपच्या माध्यमातून रात्रीत ताऱ्यांचा अभ्यास करणे, त्याच्या नोंदी ठेवणे हे काम पूर्ण केले जाते. त्याप्रमाणे सदरचा प्रोजेक्ट पूर्ण झाला. परंतु पहाटे सहाच्या सुमारास हा बलून कट करून पॅराशूट मशिनसह खाली उतरविण्याचा प्रयत्न सुरू असताना हवामानात बदल व वाऱ्याची दिशा बदलल्याने सांगोला शहराजवळ असलेल्या खारवटवाडी येथे पडले. तर त्यानंतर ओपन झालेले बलून टेलिस्कोप (दुर्बीण) मशिनसह शहरातील खडतरे गल्लीत मनुष्य वस्तीत लिंबाच्या झाडावर क्रॅश होऊन झाडाखाली असलेल्या कारवर कोसळले.

**गुढी उभारण्याच्या वेळेतच टेलिस्कोप कोसळल्याने गोंधळ**

रविवारी गुढीपाडवा असल्याने सूर्य उगवण्याच्या अगोदर गुढी उभी करण्याची सर्वांचीच धावपळ सुरू होती. त्या अगोदरच सकाळी लवकर ही दुर्बीण शहराच्या मध्यवर्ती भागात कोसळल्यामुळे सर्वत्र गोंधळ उडाला. याबाबत चर्चा, तर्क याला उधाण आले होते. परंतु सांगोला पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक भीमराव खणदाळे त्यांच्या सहकार्यांनी येऊन त्यावर असलेल्या फोननंबरवरून संपर्क साधत त्या संशोधन केंद्राला घडलेली घटना सांगितली. संशोधन केंद्रातील अधिकाऱ्यांनी येऊन त्या उपकरणाची पाहणी केली व पोलिस स्थानकामध्ये याबाबत सविस्तरपणे माहितीही दिली.

# समाजमाध्यमांवरील दिशाभूल करणाऱ्या बातम्यांचे सीईटीकक्षाकडून स्पष्टीकरण

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे शैक्षणिक वर्ष सन२०२५-२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या एमबीए एमएमएस व अभियांत्रिकी या सामाईक प्रवेश परीक्षांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तींच्या व्यक्तींकडून अवांछित कॉल (स्पॅम कॉल) च्या माध्यमाद्वारे उमेदवारांना गैरप्रकारे पर्सेंटाईल वाढवून देण्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. सदर तक्रारींची तातडीने दखल घेवून एफआयआर दाखल केला आहे. संबंधितांना अटक करण्यात आली आहे. परंतु याबाबत काही समाजमाध्यमांवर विद्यार्थ्यांचा डेटा सुरक्षित नाही असे संभ्रम निर्माण करणारे वृत्त प्रसिद्ध झाले आहे.त्यामुळे विद्यार्थी पालक यांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण होऊ शकते अशा समाजमाध्यमांवरील दिशाभूल करणाऱ्या बातम्यांचे सीईटीकक्षाकडून स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

सीईटी परीक्षा पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत असून विद्यार्थी आणि पालकांनी अफवांना बळी पडू नये आवाहनही सीईटी कक्षाकडून करण्यात आले आहे.विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याकरीता विविध उपाय योजना करण्यात आल्या आहेत. परीक्षा केंद्रावर परीक्षा देण्यासाठी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांच्या प्रवेशपत्राची पडताळणी क्युआर कोडच्या माध्यमातून करण्यात येत आहे. तसेच उमेदवारांचे फेशल रेकग्नीशन (चेहरा पडताळणी) बायोमॅट्रीक उपस्थिती घेण्यात येणार आहे.

प्रत्येक परीक्षा केंद्रामध्ये सीसीटीव्ही लावण्यात आलेले असून सदर प्रक्रीयेच्या लाईव्ह स्ट्रिमिंगद्वारे सीईटी कक्षात देखरेख करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक परीक्षा केंद्रामध्ये पर्यवेक्षण करणाऱ्या पर्यवेक्षकांना बॉडी कॅम उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन परीक्षे दरम्यान कोणताही गैरप्रकार होवू नये याची दक्षता घेण्यात येत आहे.

तसेच उमेदवाराची पडताळणी त्यांनी सोबत आणलेल्या मुळ ओळख पत्रावरुन उदा. आधार कार्ड पॅन कार्ड पारपत्र इत्यादी करण्यासाठी गट-अ शासकीय अधिकाऱ्यांची केंद्र प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी विभागीय स्तरावर सहसंचालक तंत्रशिक्षण यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. परीक्षे दरम्यान परीक्षा केंद्रावर काही अडचण आल्यास सीईटी कक्षाशी समन्वय साधुन तातडीने दूर करण्याकरीता जिल्हा स्तरावर शासकीय संस्थांच्या प्राचार्यांची जिल्हा समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सर्व जिल्ह्यामधील परीक्षा केंद्रावर भरारी पथकामार्फत सुध्दा तपासणी करण्यात येणार आहे.

या कार्यालयाच्यावतीने एमबीए/एमएमएस या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी दिनांक १ व २ आणि ३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.०० ते ११.३० वा. दुपारी ०२.०० ते ४.३० वा. या दोन सत्रात महाराष्ट्रातील व महाराष्ट्र बाहेरील एकूण १७४ परीक्षाकेंद्रांवर परीक्षा घेण्यात येणार असून सदर परीक्षेस १.५७ लाख उमेदवार बसणार आहेत. परीक्षा केंद्र व आजुबाजूच्या परीसरामध्ये कायदा व सुव्यवस्तथेचे योग्य नियोजन करुन परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याकरीता अपर मुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी पोलिस आयुक्त पोलिस अधिक्षक यांना परीक्षा केंद्रावर योग्य ती पोलिस सुरक्षा पुरविण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. कोणत्याही भुलथापांना बळी नये विद्यार्थ्यांनी तणावमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी असे सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्हाध्यक्षपदी दत्तात्रय डोके यांची निवड



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अखिल महाराष्ट्र असंघटित कामगार संघटना सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी तांदुळवाडी तालुका माळशिरस येथील सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय विश्वंभर डोके यांची निवड झाली आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये असंघटित कामगारांना न्याय देण्यासाठी अखिल महाराष्ट्र असंघटित कामगार संघटनेची महत्त्वपूर्ण भूमिका राहिलेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर जाळे असणाऱ्या या अखिल महाराष्ट्र असंघटित कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सलीम शहा यांनी सोलापूर जिल्हा अध्यक्ष या पदासाठी तांदूळवाडी तालुका माळशिरस येथील सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय विश्वंभर डोके यांची नियुक्ती केली असून त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र स्वागत होताना दिसत आहे.२०१७ पासून असंघटित कामगारांना संघटित करून त्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी चालू असणारे प्रयत्न व यातून बांधकाम कामगार लाभार्थीचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांची सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी निवड केली आहे. दत्तात्रय डोके यांनी बांधकाम कामगार विभागाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आजपर्यंत डोके यांनी प्रयत्न केलेला असून त्याचा प्रत्यक्ष लाभ लाभार्थ्यांना होताना दिसत आहे. या त्यांच्या झालेल्या निवडीबद्दल तांदुळवाडी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.याप्रसंगी सहकार महर्षी कारखान्याचे संचालक विजय पवार, जनार्धन मिले, तानाजी पाटील, उद्धव मिले, प्रमोद निंबाळकर, विलास पाटील, अमोल राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना दत्तात्रय डोके म्हणाले की, ग्रामीण भागातील असंघटित कामगारांना एकत्रित करून त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. या लाभापासून कुणीही वंचित राहणार नाही याची विशेष काळजी घेणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

त्यांच्या या निवडीबद्दल मोहिते पाटील परिवारातील सदस्यांनीही त्यांचे विशेष अभिनंदन केले.

# सहकार महर्षी कारखाना सेवकांची पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

## चेअरमनपदी युवराज इनामदार यांची निवड

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी युवराज इनामदार यांची निवड झाली असून व्हॉइस चेअरमन पदी पांडुरंग इनामदार यांची निवड करण्यात आली आहे.



सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित शंकरनगर अकलूज या संस्थेची २०२४ -२०२५ ते २०२९ - २०३० पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली.कारखान्याचे मार्गदर्शक संचालक तथा महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील तसेच चेअरमन जयसिंह मोहिते पाटील व संचालिका स्वरूपाराणी मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असणाऱ्या या पतसंस्थेने कामगारांच्या हितासाठी विविध निर्णय घेत नेहमी कामगार हित जोपासले आहे. त्यांच्याच मार्गदर्शनाने ही निवड बिनविरोध पार पडली. यामध्ये २०१६ पासून कारभार पाहत असणारे युवराज भिमराव इनामदार यांना चेअरमन पदाची पुनश्च संधी प्राप्त झाली तर व्हाइस चेअरमन म्हणून पांडुरंग इनामदार यांची निवड करण्यात आली आहे

त्याचबरोबर सचिव पदी अभिजीत माने देशमुख, खजिनदार म्हणून केशव मोहिते, तर संचालक म्हणून गणेश लोकरे, अशोक डोके, बाळासाहेब किर्दकर, गुलाब देशमुख, संतोष नाशिककर, कल्याण जाधव, नामदेव सावंत, संदीप खंडागळे, नागेश झपके यांची बिनविरोध निवड झाली आहे.तर मॅनेजर पदाचा कारभार नागेश राजमाने हे पाहत आहेत.या झालेल्या निवडी बद्दल नूतन चेअरमन, व्हाईस चेअरमन व सर्व नूतन संचालकांचे कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, संचालिका कु.स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी सत्कार करून अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# राज्यातील महामार्गावर महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह - आदिती तटकरे

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** चौथ्या महिला धोरणात महिलांसाठी आरोग्य आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करण्याबाबत अधिक प्राधान्य देण्यात येणार आहे. यानुसार महामार्गावर प्रत्येक २५ किलो मीटर अंतरावर सुसज्ज स्वच्छतागृह बांधण्यात येणार आहेत. या स्वच्छतागृहांचे देखभाल व व्यवस्थापन स्थानिक महिला बचतगटामार्फत करण्यात येईल. याशिवाय महामार्गावर बचतगटांना उत्पादनांची विक्री व्यवस्था करण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बाल विकास



मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

महिला धोरणात महिलांच्या सुरक्षेला अधिक प्राधान्य देताना राज्यातील महामार्गावरील स्वच्छतागृहांची दुरावस्था दूर करण्याबाबतही अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले होते. यात प्रामुख्याने राज्यातील राज्य महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, समृद्धी महामार्गासह द्रुतगती महामार्गावर प्रत्येक २५ किलोमीटर अंतरावर महिलांसाठी स्वच्छतागृह उभारण्याचे निश्चित करण्यात आले होते. महिला व बाल विकास विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या समन्वयातून हा प्रकल्प राबविला जाणार असल्याची माहिती मंत्री तटकरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

स्वच्छतागृहांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग करणार असून, जन सुविधा केंद्राचे व्यवस्थापन माविम स्थापित बचत गटांमार्फत करण्यात येणार आहे.

# सोलापूरसह अनेक जि.प.मध्ये अतिरिक्त शिक्षकांमुळे होणार नाही नवी पदभरती




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या दोन हजार ७७७ शाळांमध्ये सध्या शिक्षकांची ७०० पदे रिक्त आहेत. सध्या सुरू असलेल्या शिक्षक भरतीत तेवढीच पदे भरली जातील, अशी आशा होती. मात्र, पटसंख्येअभावी नवीन संचमान्येच्या निकषांनुसार तेवढीच पदे अतिरिक्त होणार असल्याने शिक्षक भरतीत सोलापूर जिल्हा परिषदेला एकही नवा शिक्षक मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अशीच स्थिती राज्यातील अनेक जिल्हा परिषदांमधील आहे.

सोलापूर जिल्ह्यात नव्याने वाढणाऱ्या एलकेजी, यूकेजी व पहिली ते चौथीपर्यंतच्या इंग्रजी माध्यमांच्या खासगी शाळांची संख्या ४०० हून अधिक आहे. २०२४-२५ या एका वर्षात जिल्ह्यात सुमारे ५० इंग्रजी शाळा वाढल्या आहेत. याशिवाय 'सीबीएससीई'सह अन्य बोर्डाच्या इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यमांच्याही शाळांची संख्या ६० पेक्षा जास्त आहे. शहराबरोबरच गावागावांतील पालकांचा कल आता बदलल्याने मराठी शाळा विशेषतः जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पट झपाट्याने कमी होऊ लागला आहे.

# माकप कडून जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात 1 लाख सह्यांची मोहीम यशस्वी करा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** धर्म, जात, प्रांतांच्या आधारे द्वेष पसरवून सामाजिक एकोपा नष्ट करणाऱ्या राजकारणाच्या विरोधात संविधान, लोकशाही व स्वातंत्र्याचा गळा घोटून जनसुरक्षा विधेयकाच्या माध्यमातून हुकुमशाही लादण्याच्या विरोधात जातीय अत्याचार, भेदभाव व सर्व प्रकारच्या हिंसेचा व शोषणाचा विरोध करण्यासाठी संविधान, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सामाजिक एकोपा, प्रेम व माणुसकीचे रक्षण करण्यासाठी जनसुरक्षा विधेयक मागे घ्या या मागणीसाठी सोलापुरात 1 लाख स्वाक्षरी मोहीम हाती घेतली असून ते यशस्वी करा असे आवाहन माकप चे ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर यांनी केले.

ते पुढे म्हणाले की महाराष्ट्र सरकारने जनतेच्या अभिव्यक्तीचे व अन्यायाविरोधात संघटित होण्याचे अधिकार संपुष्टात आणण्यासाठी विशेष जनसुरक्षा विधेयक तयार केले आहे. सरकारचे हे विधेयक शहरी नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी आणण्यात आले असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात जनतेचे ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी संघर्ष करणाऱ्या सर्वच प्रामाणिक व्यक्ती व संघटनांचा आवाज दाबण्यासाठीच हे विधेयक आणले जात आहे. जनतेचे संविधानिक अधिकार काढून घेऊ पाहणाऱ्या राज्य सरकारच्या या कृतीचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष जाहीर निषेध करत असून सरकारने हे विधेयक विनाविलंब मागे घ्यावे अशी मागणी करत आहे.

राज्यात सरकारच्या धोरणांमुळे जनतेचे जगण्यामरण्याचे प्रश्न गंभीर बनले आहेत. राज्यातील विविध समूहांमध्ये यामुळे मोठा असंतोष खदखदतो आहे. शेतकरी, कामगार, शेतमजूर, विद्यार्थी, युवक व महिला संघटित होऊन या विरोधात तीव्र आंदोलने करत आहेत. रोजगार व शिक्षणाच्या आशेपायी राज्यातील विविध समूह आरक्षणाच्या मागण्यांसाठी लढत आहेत. शेतीमालाचे भाव, पीक विमा, रोजगार हमीची कामे, जमिनीचे हक्क, जमीन अधिग्रहण व पुनर्वसनाचे प्रश्न, बेसुमार महागाई, किमान वेतन, योजना कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचारी म्हणून दर्जा, महिलांना समानतेचे हक्क, धार्मिक व जातीय अत्याचार, शिक्षण व रोजगार, यासारख्या ज्वलंत प्रश्नांवर जनसमूह लोकशाही मार्गाने आवाज उठवीत आहेत. राज्य सरकारला जनतेचे हे प्रश्न सोडविण्याऐवजी त्यांची लोकशाही आंदोलने मोडून काढायची आहेत. आपला कॉर्पोरेटधार्जिणा, धर्मांध, जातीयवादी अजेंडा निर्धोकपणे पुढे रेटण्यासाठी या सरकारला जनतेच्या लोकशाही अधिकारांना सुरुंग लावायचा आहे. राज्य सरकारने याचसाठी राज्यात विशेष जनसुरक्षा विधेयक आणले आहे.

व्यक्ती आणि संघटनांच्या बेकायदेशीर कारवायांचा बंदोबस्त करणे, हा विधेयकाचा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. देश व देशातील जनतेच्या हिताला व सुरक्षेला बाधा आणणाऱ्या बेकायदा कृत्यांचा बंदोबस्त कुणी केला तर त्याचे स्वागतच आहे. मात्र या आडून अन्याय, अत्याचार, विषमता व हुकुमशाही विरोधात लोकशाही मार्गाने लढणाऱ्या व्यक्ती व संघटनांना घेरले जाणार असेल तर ते नक्कीच निषेधार्ह आहे. बेकायदेशीर कृती व बेकायदेशीर संघटनांना प्रतिबंध करता येईल असे अनेक कायदे आजमितीस अस्तित्वात असताना नव्याने हा कायदा केला जात असल्यामुळे सरकारच्या हेतूबद्दलच गंभीर शंका निर्माण झाली आहे.

विधेयकामध्ये बेकायदेशीर कृती व बेकायदेशीर संघटना, याबाबतच्या व्याख्या हेतुतः अत्यंत ढोबळ ठेवण्यात आल्या आहेत. कोणते कृत्य 'बेकायदेशीर' आहे व कोणती संघटना 'बेकायदा' आहे हे ठरविण्याचा अधिकार सरकारला देण्यात आला आहे. विधेयकानुसार 'बेकायदेशीर' म्हणून घोषित संघटनेचा सभासद, त्यांना मदत करणारा, मदत मागणारा अभियाचक, मदत स्वीकारणारा किंवा या संघटनेच्या कामात भाग घेणारा, मिटींगला हजर राहणारा यास ३ वर्षापर्यंत कारावास्त्रची शिक्षा आणि ३ लाख रुपयांपर्यंतचा दंड प्रस्तावित करण्यात आला आहे. संघटनेचा सभासद नसलेला पण संघटनेस मदत करेल वा सदस्यास आश्रय देईल, त्यास २ वर्ष कारावास व २ लाख रुपये दंड, जो कोणी अशा संघटनेचे व्यवस्थापन करेल, किंवा प्रेरणा देत असेल किंवा तसा प्रयत्न करत असेल, बेत आखत असेल त्यास ७ वर्षे कारावास व ५ लाख रुपये दंड अशा भयानक तरतुदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. श्रमिकांच्या आणि सामान्य नागरिकांच्या सर्वच संघटना मोडीत काढण्यासाठीच हे सारे सुरू आहे. अशा पार्श्वभूमीवर समविचारी पक्ष व संघटनांची एकजूट मजबूत करून सर्व स्तरांवर या विधेयकाचा विरोध करण्याचा निर्णय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने घेतला आहे. सरकारने आपले हे लोकशाही विरोधी विधेयक तातडीने मागे घ्यावे अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आहे.

राज्यात व देशात या बरोबरच धार्मिक द्वेषाच्या आधारे जनतेत दंगे भडकावून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, संघ परिवार व भाजपकडून सुरु आहे. संविधान, लोकशाही व धर्मनिरपेक्षतेला यामुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. भाजप व संघ परिवार जाती जातींमध्ये वेगवेगळ्या मुद्यांवर कलह निर्माण करून राज्याची सामाजिक वीण स्वार्थी राजकारणासाठी नष्ट करत आहे, ते आपला मनुवादी अजेंडा सर्व स्तरांवर पुढे रेटत असल्याने जातीय अत्याचार, स्त्रियांवरील अत्याचार आणि शोषणात राज्यात वाढ झाली आहे. इतिहासाची द्वेषमूलक आणि चुकीची मांडणी करून सामाजिक एकोपा नासविण्याचे प्रयत्न ही या धर्मांध शक्तींकडून सुरू आहेत.

अशा या भीषण परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज, शाहू-फुले-आंबेडकर आणि प्रेम व मानवतेचा संदेश देण्ट्र्या वारकरी परंपरेचा वारसा असलेल्या महाराष्ट्रातील हे बिघडलेले वातावरण आपल्याला सर्वांना मिळून दुरुस्त करायचे आहे. शिवाय जनसुरक्षा विधेयकाच्या माध्यमातून जनतेचे, जनचळवळींचे व संघटनांचे लोकशाही अधिकार हिरावून घेणाऱ्या षडयंत्राचाही आपल्याला पाडाव करायचा आहे. आपली सर्वांची एकजूट यासाठी आवश्यक आहे. आपल्या या प्रयत्नांना पाठिंबा म्हणून, सोबत दिलेल्या कागदावर एक स्वाक्षरी करून आपण आपला पाठिंबा सदरच्या मागण्यांना व विचारांना व्यक्त करावा ही विनंती आम्ही आपल्याला करत आहोत.

# शेतकरी क्रांती सेना या संघटनेची स्थापना

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** रविवारी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अक्कलकोट येथे शेतकरी क्रांती सेना या संघटनेची स्थापना करण्यात आली. तालुक्यासह सोलापूर जिल्ह्या व महाराष्ट्रातील शेतकऱ्यावरती खूप अन्याय होत आहे. शेतकऱ्यांच्या साठी लढा लढण्यासाठी राजकीय पक्ष विरहित शेतकऱ्यांच्या जीवनात चांगले दिवस आणण्यासाठी शेतकरी क्रांती सेनेची स्थापना करत आहोत अशी माहिती शेतकरी सेनेचे प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रामुख्याने अक्कलकोट तालुक्यातील सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे जीवन मान उंचवण्यासाठी, पिक विमा, हमीभाव, शेतीसाठी पाणी खत व्यवस्थापन, ऊसदार तलाव जोडो, सह शेतकऱ्याच्या प्रत्येक कामासाठी संघर्ष करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे. शेतकऱ्याच्या मुलांच्या शिक्षणाचे जीवन उंचावणे, उत्पादनासाठी शेतकऱ्यांना ट्रेनिंग देणे, गट शेती करून शेतकऱ्यांचा खर्च कमी करणे, शेतकऱ्याच्या पीक नियार्ती सह सर्व शेती संबंधित निगडित विषयासाठी व्यापक काम करण्यासाठी शेतकरी क्रांती सेनेची स्थापना केली आहे. अक्कलकोट तालुक्यातील व सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कुठलीही समस्या सोडवण्यासाठी शेतकरी क्रांती



सेनेशी संपर्क करावा, आपल्या प्रत्येक कामात शेतकरी क्रांती सेना मदत करण्याचा विश्वास शेतकरी सेना प्रमुख म्हणून देतो असे आनंद बुक्कानुरे म्हणाले. यावेळी शेतकरी सेनेचे पदाधिकारी शरण सुरवसे, महांतेश हत्तुरे, मल्लिनाथ अरवतकल, राम जाधव, मोहम्मद पठाण, श्रीशैल स्वामी, गुरुनीगप्पा आप्पा पाटील, शांतिवीर कळसगोंडा, स्वामीनाथ प्रचंडे, बसवराज पुजारी, जितू अनंतपुरे, संतोष पाटील, चंद्रकांत कुंभार, सिद्धाराम बिराजदार, मल्लू कल्याण, उमेश साळुंखे, मृगेंद्र मुदेनकेरी, अफसर मकानदार, श्रीशैल दानशेट्टी, हनुमंत नागोरे, रफिक मुजावर, बिरू माळगे, कृष्ण राजपूत, भीमा भासगी, आदित्य हिबारे, संजय अरवतकल, सुनील धर्मसाले, नागू शिंदे,आदी उपस्थित होते. लवकरच शेतकरी क्रांती सेनेचे सर्व कार्यकारणी घोषित करण्यात येईल. मोठ्या प्रमाणात पदाधिकारी उपस्थित होते.